७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांसाठी उच्चाधिकार समितीचे पुनर्गठन

■ ५ ते १०० कोटींपर्यंत खर्चास मान्यता

मुंबई (दै. संध्या) : राज्यातील माहिती तंत्रज्ञानविषयक धोरण व प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी उच्चाधिकार समितीचे पुनर्गठन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच या समितीची कार्यकक्षा नव्याने निश्चित करत वित्तीय मान्यतेची सुधारित मर्यादाही ठरविण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या 5 ऑक्टोबर 2001 च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन दशकांत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले आहेत. वाढती महागाई, रुपयाचे अवमूल्यन, तांत्रिक प्रगती, सायबर सुरक्षा, ऑनलाईन सेवा वितरण, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वाढता वापर तसेच ई-गव्हर्नन्स प्रकल्पांची वाढलेली व्याप्ती व खर्च या पार्श्वभूमीवर माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांचे स्वरूप आणि किंमत लक्षणीयरीत्या बदलली आहे.

### ढिंग-टांग




# मराठीला ज्ञान भाषेत रूपांतरित करून पुढील पिढीपर्यंत नेऊया

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधान भवनात ‘ जावे विनोदाच्या गावा‘ विशेष कार्यक्रम ■

**मुंबई (दै. संध्या)**

जगामध्ये ज्ञानभाषा असलेल्या भाषांच पुढे प्रवाहित होत असल्याचा इतिहास आहे. ज्या भाषेतून व्यवहार चालतो, रोजगार मिळतो, ती भाषा प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेऊया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित ‘ जावे विनोदाच्या गावा’ या विशेष कार्यक्रमात व्यक्त केला.



कार्यक्रमास व्यासपीठावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे, विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्या काळात मराठी भाषा शुद्ध होण्यासाठी शब्दकोश तयार केला. त्यावेळी प्रशासन चालविताना मराठीवर फारशी, अरबी या भाषांचे आक्रमण होते. त्यामुळे मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराज यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान हा सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून सुरू होतो. सुरुवातीच्या काळातील आद्य ग्रंथांमधून आपली मराठी भाषा किती अभिजात आहे, हे आपल्याला पाहायला मिळते. महाराष्ट्राच्या विधान मंडळात चालत असलेले कामकाज राजकीय मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल, पुढे न्यायचे असेल तर तंत्रज्ञान, संशोधने ही मराठी भाषेतूनच झाली पाहिजेत. तेव्हा मराठी ही ज्ञानभाषा होईल, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केला.

अध्यक्ष नार्वेकर म्हणाले, मराठी भाषा ही देशातील अधिकृत २२ भाषांपैकी एक असून देशात १ हजार ६५२ बोलीभाषा आहेत. मराठी भाषिक लोकसंख्या ही देशात तिसऱ्या आणि जगामध्ये दहाव्या क्रमांकावर आहे. मराठी भाषेला समृद्ध आणि पुढे नेण्यासाठी शासनस्तरावर विविध प्रयत्न करण्यात येत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यात आला. मराठी भाषा समृद्ध करणे आणि पुढील पिढीपर्यंत टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचेही ते म्हणाले.

मराठी माणसाच्या रक्तातच विनोद आहे. विनोद हा समाजामध्ये माणूस जोडणारा पूल आहे. त्यामुळे संकटातही जो विनोद शोधतो, तोच खरा मराठी माणूस आहे, अशा शब्दात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी माणसाचा गौरव केला.

### मराठी भाषेचा अधिकाधिक उपयोग करावा : सुनेत्रा अजित पवार

तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना डिजिटल माध्यमांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येक डिजिटल माध्यमांचा उपयोग करताना मराठीचा उपयोग करीत अधिक सक्षमपणे पुढील पिढीपर्यंत समृद्ध मराठीचा वारसा नेण्यात यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री सुनिता पवार म्हणाल्या, लंडनमध्ये मराठी व महाराष्ट्राच्या संस्कृतीचे केंद्र ठरणाऱ्या प्रस्तावित महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी मागील काळात पाच कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. मराठी भाषेच्या प्रचारासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदानही वाढवून देण्यात आले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे समस्त मराठी जन आनंदित झाले आहेत. हा मराठी भाषेचा खूप मोठा गौरव आहे. मराठी भाषा ही अर्थार्जनाची भाषा होण्यासाठी हा दर्जा निश्चितच महत्त्वाचा ठरणार आहे.

### ब्रेकिंग न्यूज

## दौंडमधील तीन तीर्थक्षेत्रांना ‘ब’ दर्जा

खुटबाव (दै. संध्या) : दौंड तालुक्यातील राहू येथील श्री शंभू महादेव मंदिर, कुसेगावचे भानोबा देवस्थान आणि नारायण बेट या तीन तीर्थक्षेत्रांना राज्य सरकारने "ब" वर्ग दर्जा दिला असून, प्रत्येकी पाच कोटी रुपयांचा विकासनिधी मंजूर केला आहे. आमदार राहुल कुल यांनी विधानसभेत केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी ही घोषणा केली. विधानसभेत अर्धा तास चर्चेदरम्यान आमदार कुल यांनी मतदारसंघातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना मंत्री गोरे यांनी सांगितले की, राहू, कुसेगाव आणि नारायण बेट या देवस्थानांच्या प्रस्तावातील त्रुटी जिल्हा परिषदेकडून तातडीने दूर केल्या जातील. तसेच नारायण बेट येथील वनक्षेत्रातील जागा व तांत्रिक बाबी निकाली काढण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. याशिवाय केडगावचे पद्मावती मंदिर, रोटीचे रोटमलनाथ आणि राजेगावचे राजेश्वर मंदिर या देवस्थानांच्या प्रस्तावांची पडताळणी करून त्यांनाही न्याय दिला जाईल, असे आश्वासन मंत्र्यांनी दिले.

## लोकलचे वेळापत्रक कोलमडणार!

मुंबई (दै. संध्या) : उपनगरी रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती, तसेच सिग्नल यंत्रणेत काही तांत्रिक कामे करण्यासाठी रविवारी (ता. १) तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या सीएसएमटी ते विद्याविहार अप आणि डाऊन धीम्या मार्गावर, तर हार्बर मार्गावरील वाशी ते कुर्ला अप आणि डाऊन मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेवर चर्चगेट ते मुंबई सेंट्रल अप-डाऊन धीम्या मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

*मध्य रेल्वे*

*कुठे - सीएसएमटी ते विद्याविहार अप आणि डाऊन धीम्या मार्गावर*

*कधी - सकाळी १०.५५ ते दुपारी ३.३५ वाजेपर्यंत*

परिणाम - या ब्लॉकदरम्यान सीएसएमटी येथून सुटणाऱ्या धीम्या गाड्या सीएसएमटी ते विद्याविहार स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवल्या जातील. या गाड्या भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांत थांबतील आणि पुढे विद्याविहार स्थानकापासून डाऊन मार्गावर वळवण्यात येतील.

## आपला देश न्यायव्यवस्थेवर चालतो; केजरीवाल प्रकरणी अण्णा हजारेंची प्रतिक्रिया

**अहिल्यानगर(दै. संध्या)**

दिल्ली मद्य धोरण प्रकरणात सीबीआयच्या तपासाला मोठा धक्का बसला आहे. दिल्लीच्या राउज एव्हेन्यू कोर्टाने आम आदमी पक्षाचे नेते व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह सर्व 23 आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. आरोपपत्रात लावलेले आरोप सिद्ध करण्यासाठी ठोस पुरावे नाहीत, असे कोर्टाने म्हटले आहे. यावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना अण्णा हजारे म्हणाले, आपला देश न्यायव्यवस्थेवर चालतो. आपल्या देशात न्यायव्यवस्था सर्वोच्च



स्थानावर आहे. आपला देश खूप मोठा आहे, पक्ष-पार्टी, जाती-पाती, धर्म, इतका मोठा आपला देश आहे, पण सगळे सुरळीत चालते, याचे कारण न्यायव्यवस्था. न्यायव्यवस्थेच्या आधारवर आपल्याला चालावेच लागणार आहे. जर न्यायव्यवस्था नसती तर हे गुंड, लफंगे, दंगली झाल्या असत्या. परंतु, न्यायव्यवस्था आहे म्हणून सगळे योग्य सुरू असल्याचे हजारे यांनी म्हटले.

## ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून सुविधा निर्माण करा : राज्यमंत्री

**मुंबई (दै. संध्या)**

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनाच्या अपार संधी आहेत. या भागात देश विदेशातील पर्यटक येत असतात. कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत दापोली तालुक्यात पर्यटक सुविधांची कामे सुरू आहेत. या पर्यटन विकास कार्यक्रम अंतर्गत दर्जेदार स्वरूपाची कामे करून पर्यटकांसाठी उत्तम सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री योगेश कदम यांनी मंत्रालयात आयोजित कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत दिल्या.

बैठकीस मंत्रालयात ग्रामीण विकास विभागाचे उपसचिव सुभाष इंगळे, चिपळुण सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश



सुखदेवे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हर्षल चव्हाण उपस्थित होते, तर दूरदृश्य प्रणालीद्वारे रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांनी बैठकीत सहभाग घेतला.

कामांचा आढावा घेत असताना राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, गावातील बचत गटांचा कोकण पर्यटन ग्रामीण विकास कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्यात यावा. बचतगटाच्या सूचनांचाही अंतर्भाव करण्यात यावा.कर्दे ग्रामपंचायत हद्दीतील प्रशासकीय मान्यता मिळालेली कामे पूर्ण करावी. या कामांसाठी मिळालेला निधी विहित कालावधीत खर्च होण्याची दक्षता घ्यावी. कामांच्या दर्जाबाबत तडजोड केल्या जाणार नाही.

कर्दे खाडीवर पूल बांधणे, खाडी येथे संरक्षक बंधारा बांधणे तसेच कर्दे येथे समुद्र किनाऱ्यालगत सांस्कृतिक संकुल बांधकाम या कामांसाठी सीआरझेड (कोस्टल रेग्युलेशन झोन) ची परवानगी मिळण्याची कार्यवाही पूर्ण करावी. कर्दे परिसरात पायाभूत सुविधांची कामे गतीने पूर्ण करावी, असेही राज्यमंत्री योगेश कदम यांनी सूचित केले.

## कोल्हापूर-रत्नागिरी जोडणाऱ्या घाटमार्गांच्या कामांना गती द्या

**मुंबई (दै. संध्या)**

■ मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

कोल्हापूर आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या प्रमुख तीन घाटमार्गांच्या कामांना गती देण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले.

अणुस्कुरा-गावडी (ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर) ते लांजा (जि. रत्नागिरी) येथील भांबेड-धनगरवाडी रस्ता, पावनखिंड-गजापूर-विशाळगड पायथा (ता. शाहूवाडी) ते संगमेश्वर तालुक्यातील देवडे-भोवडे जोडणारा नवीन घाटमार्ग, राष्ट्रीय महामार्ग १९३ पासून बाजारभोगाव-किसरूळ-काळजवडे-पोंबरे-कोलीक-पडसाळी ते किजिडी घाटास जोडणारा रस्ता या घाटमार्गासंदर्भात



या बैठकीत चर्चा करण्यात आली.

बैठकीस आमदार डॉ. विनायक कोरे, आमदार किरण सामंत, आमदार चंद्रदीप नरके, सचिव (रस्ते) संजय दशपुते, मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) संतोष शेलार, मुख्य अभियंता (कोकण) शरद राजभोज, अधीक्षक अभियंता (कोल्हापूर) तुषार बुरूड, कार्यकारी अभियंता (विशेष प्रकल्प) चंद्रकांत आयरेकर, जिल्हा वन अधिकारी (कोल्हापूर) संजय वाघमोडे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोल्हापूर-रत्नागिरी दरम्यानचे हे रस्ते देवडे-भोवडे ते विशाळगड घाट, काजिर्डा ते पडसाळी घाट आणि भांबेड ते गावडी घाट अशा तीन प्रमुख घाटांना जोडतात. सह्याद्री पर्वतरांगांतील लांजा व संगमेश्वर तालुक्यातील अनेक मुख्य गावांना हे मार्ग जोडत असल्याने दळणवळण सुलभ होईल, घाटमाथ्यावरील नागरिकांचे जीवनमान उंचावेल तसेच पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील काही जिल्हे थेट जोडले जातील, असे मंत्री भोसले यांनी सांगितले.वन विभागाच्या आवश्यक सर्व परवानग्या पूर्ण करून रस्त्यांच्या कामांतील अडथळे तातडीने दूर करावेत. आवश्यक ठिकाणी पूल, दिशादर्शक फलक बसवावेत, घाटमार्गासाठी योग्य सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात. तसेच या मार्गांवर एसटी बसेस नियमित धावतील अशा पद्धतीने रस्त्यांची आखणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## भरधाव स्कॉर्पिओवरील ताबा सुटून अपघात : ३ वाहनांना धडक

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

■ २ कारसह रिक्षा, दुचाकीचा चक्काचूर, ६ जखमी

शहरातील सावेडी नाका परिसरात मनमाड महामार्गावर चार वाहनांच्या विचित्र अपघातात सहा जण जखमी झाले. अहिल्यानगरहून मनमाडच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या स्कॉर्पिओवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेला समोरून येणाऱ्या चारचाकीला धडकली. त्यानंतर एक रिक्षा व रस्त्याच्या कडेला थांबलेल्या एका दुचाकीलाही उडवले. दुचाकीला फरफटत नेत शेजारील गवतात कार अडकली. गुरुवारी दुपारी चारच्या सुमारास हा अपघात घडला. स्कॉर्पिओ कार भरधाव वेगात असताना दुभाजकाला घासली गेली व त्यानंतर पलटी होऊन विरुद्ध दिशेला वाहनांवर धडकली, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. घटनेनंतर महामार्गावर सुमारे एक तास वाहतूक ठप्प झाली होती. माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तोपर्यंत नागरिकांनी जखमींना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात हलवले. दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले. या अपघातात आशा रामचंद्र कुसळकर (वय ६३) यांचा मृत्यू झाला असून , अंकुश रामचंद्र कुसळकर (वय ४०, दोघे रा. श्रीगोंदा), अविष्कार सुभाष वाघ (वय २४, रा. पिंपळगाव माळवी, ता. अहिल्यानगर ), बबन भाऊसाहेब घोरपडे (वय ४९, रा. नेप्ती, ता. अहिल्यानगर) हे जखमी झाले आहेत.

## *आशा सेविकांना किमान वेतन, घराची निर्मिती, मोबाइल देणार : मुख्यमंत्र्यांशी चर्चेनंतर तोडगा काढण्याचे आश्वासन, मंत्री विखे यांच्या पुढाकाराने बैठक*

**मुंबई (दै. संध्या)**

लेखाशिर्षच्या नावाखाली पगाराला होणारा उशिर, अनावश्यक लादली जाणाऱ्या कामांबाबत फेरविचार करावा आणि कामांचे स्वरुप निश्चित करावे अशी मागणीही त्यांनी केली. आशा सेविकांना किमान वेतन लागू करावे, रुग्णालयाच्या ठिकाणी निवासासाठी आशा घराची निर्मिती करावी, मोबाइल उपलब्ध करुन देण्याच्या मागण्यांबाबत विचार करण्याचे आश्वासन शासनातर्फे देण्यात आले. तसेच अर्धवेळ परिचारकांच्या मानधनाबाबत मंत्रिमंडळ बैठकीत लवकरच निर्णय व्हावा म्हणून, माझा आग्रह आहे असेच आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी सांगितले.



अखिल भारतीय किसान सभा व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी, कामगार आणि आदिवासींच्या प्रश्नासाठी काढण्यात आलेल्या मोर्चा संदर्भात जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढाकार घेवून आंदोलकांच्या शिष्टमंडळा समवेत विविध विभागांच्या मंत्र्यांशी यशस्वी चर्चा घडवून आणली. शालेय शिक्षण आणि कामगार विभागाच्या अंतर्गत असलेल्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत चर्चा करुन, मार्ग काढण्याचे आंदोलनकर्त्यांना आश्वासित करण्यात आले.

अकोले तालुक्यातील राजूर येथून अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर हा लाँगमार्च काढण्यात येत आहे. या मोर्चात आदिवासी शेतकरी, कामगार, पोषण आहार तयार करणाऱ्या मदतनीस, वैद्यकीय क्षेत्रातील अर्धवेळ परिचारीका आपल्या मागण्यांसाठी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. आंदोलकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पालकमंत्री विखे पाटील यांनी आंदोलनाचे नेते डॉ.अजित नवले यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या समवेतील शिष्टमंडळाला मुंबई येथे चर्चेसाठी निमंत्रित केले होते.

मंत्रालयात आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, शालेय शिक्षण मंत्री दादा भूसे, आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांच्यासह आ.विनोद निकोले, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ आधिकारी उपस्थित होते. तर नाशिक आणि अहिल्यानगर येथून संबधित विभागांचे आधिकारी दुरदृष्य प्रणालीने बैठकीत सहभागी झाले होते. आंदोलकांतर्फे डॉ.अजित नवले, नामदेव भांगरे, नंदु डहाळे, अजीत साळवे, अशोक थोरात, हेमलता शेळके, कल्पना धनवटे, सविता काळे, संगीता साळवे, वैशाली सुरसे, रंजना पराड, ताराचंद विघे हे सर्व आंदोलनकर्त्यांनी बैठकीमध्ये आपल्या समस्यांची मांडणी केली.

शालेय पोषण आहार तयार करणाऱ्या मदतनीसांच्या मानधनाबाबत तसेच कामगारांच्या विमा योजनेत अचानक केलेल्या नियमांच्या बदलांबाबत गांभिर्याने या बैठकीत चर्चा झाली. प्रामुख्याने बांधकाम कामगारांच्या योजनांमध्ये होत असलेला गोंधळ, यामध्ये वाढलेली दलाली लक्षात घेवून तालुका स्तरावरच आता निवड समिती नियुक्त करण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत चर्चा करुन, तातडीने मार्ग काढण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला शासनातर्फे देण्यात आले आहे.

धान उत्पादकांप्रमाणेच हिरडा उत्पादकांना बोनस वन जमिनींच्या बाबतीत असलेले पुरावे ग्राह्य धरुन, आदिवासी दाखले मिळावेत. सातबारा उता-यावर नोंद व्हावी. शासकीय योजनांचा पुर्णत:लाभ मिळावा.

## संपादकीय

# काही लोकांकडे मखमली गादी आणि अनेकांकडे चटईही नाही?

वर्ल्ड इनइक्वालिटी रिपोर्ट २०२६ नुकताच काही काळापूर्वी जाहीर झाला. दोनशे नामवंत अभ्यासकांनी अत्यंत तपशीलवारपणे तयार केलेल्या या 'जागतिक असमानता अहवाला'तील मुख्य निष्कर्ष काय? जग अत्यंत असमान आहे: जगातील सर्वात गरीब अर्धे लोक एकूण जागतिक उत्पन्नाच्या केवळ ८ टक्के एवढेच कमावतात, तर वरच्या १० टक्के लोकांचे उत्पन्न (इन्कम) उर्वरित ९० टक्के लोकांपेक्षा जास्त आहे. संपत्ती (वेल्थ) आणखीनच केंद्रित आहे. वरच्या १० टक्के लोकांकडे जागतिक संपत्तीचा ७५ टक्के, तर खालच्या अर्ध्या लोकांकडे फक्त २ टक्के भाग आहे. सर्वात वरच्या १ टक्के लोकांची संपत्ती ही



खालच्या ९० टक्के लोकांपेक्षा दीडपट अधिक आहे. वरच्या ०.००१ टक्के (सुमारे ५६,०००) लोकांकडे जगातील अर्ध्या लोकसंख्येपेक्षा ३ पट जास्त संपत्ती आहे. हे आर्थिक केंद्रीकरण वेगाने वाढते आहे.

जगात एका मोजक्या 'अल्पसंख्याक' गटाकडे अभूतपूर्व आर्थिक शक्ती आहे, तर अब्जावधी लोक मूलभूत आर्थिक स्थिरतेपासूनही वंचित आहेत. वशिष्ठ अनुप त्यांच्या 'इसलिये' या कवितेत म्हणतात त्याप्रमाणे.. 'हो किसी के लिए मखमली बिस्तरा, और किसी के लिए एक चटाई ना हो' अशी ही विचित्र परिस्थिती आहे.

मुळातच कमी सरासरी उत्पन्न असलेला भारत हा जगात सर्वाधिक आर्थिक असमानता असलेल्या देशांपैकी एक आहे. सर्वात श्रीमंत १० टक्के लोकांकडे एकूण संपत्तीच्या ६५ टक्के आणि त्यातही वरच्या १ टक्के लोकांकडे ४० टक्के संपत्ती आहे, तर खालच्या ५० टक्के लोकांचा हिस्सा फक्त ६.४ टक्के आहे. सार्वजनिक व्यवस्था अत्यंत कमकुवत असलेल्या आपल्यासारख्या जिथे विविध देशांमध्ये, जीवनावश्यक गरजांसाठी, प्रगतीच्या संधींसाठी आणि कठीण समयी सुरक्षितता म्हणून पैसा अधिकाधिक महत्त्वाचा ठरतो, तिथे कमालीची आर्थिक असमानता ही विशेष धोकादायक आहे. हवामान बदलातील योगदानाचे वितरण देखील असमान आहे. जगातील सर्वात गरीब अर्ध्या लोकसंख्येचा कार्बन उत्सर्जनाचा वाटा फक्त ३ टक्के आहे, तर वरच्या श्रीमंत १० टक्के लोकसंख्येचा वाटा ७७ टक्के आहे. त्यातही टॉप १ टक्के लोक ४१ टक्के उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. जे कमी उत्सर्जन करतात ते हवामानाच्या धक्क्यांना सर्वाधिक बळी पडतात. दरम्यान, जे सर्वात जास्त उत्सर्जन करतात त्यांच्याकडे हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेण्यासाठी किंवा टाळण्यासाठी भरपूर संसाधने असतात. म्हणूनच, कार्बन उत्सर्जनातील जबाबदारीची ही प्रचंड तफावत जगण्याच्या जोखमीचे देखील असमान वितरण आहे. अमेरिकेच्या 'डिक्लेरेशन ऑफ इंडिपेंडन्स'मधील 'ऑल मेन आर क्रिएटेड इक्वल' ही ओळ प्रसिद्ध आहे. आजची जागतिक परिस्थिती मात्र त्यातील मोजक्यांनाच आर्थिक समृद्धीच्या संधी व त्यात वाटा देते आणि ही असमानता केवळ उत्पन्न वा संपत्तीपुरती मर्यादित राहत नाही, तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर परिणाम करते. प्रश्न हा की आता याचे काय करायचे? तुमची एकूण संपत्ती (सर्व असेट्स, शेती, घर, गुंतवणूक मिळून) ६० लाख रुपये असल्यास तुम्ही जगातील सर्वाधिक श्रीमंत १० टक्क्यांमध्ये आहात आणि ६.५ लाख रुपये तुम्हाला मधल्या ४० टक्क्यांचा भाग बनवतात. याचाच अर्थ जगातील अर्ध्या लोकसंख्येकडे साडेसहा लाख रुपये इतकीदेखील संपत्ती नाही. असे जग न्याय्य व सर्वांसाठी राहायला योग्य आहे का?

## संस्कृत सुभाषित

अनारम्भाभतु कार्याणा नार्थ : संपद्यते क्वचित्।।
(सौप्तिकपर्व, अध्याय २, ३४ महाभारत)
अर्थ –कार्याला आरंभ केल्याशिवाय कधीच कोणतीच गोष्ट साध्य होत नसते.

## गुरु वचन

### सर्वांप्रती समान भाव असावा

एक स्वामी शारीरिक प्रकृतीने खूपच कमजोर होते. परंतु दररोज गंगास्नानाशिवायही इतरही काम ते करायचे. नदीच्या काठावर त्यांना खूप अडचण येत असे यासाठी स्नानाच्यावेळी ते ब्राह्मणाची मदत घेत होते व नंतर परतताना कोणत्याही जातीच्या व्यक्तीच्या खांद्यावर हात ठेऊन वरती येत होते. स्वामींच्या या वागणुकीला तेथील साधू-संत चांगले मानत नव्हते. व त्यांनाही काही म्हणू शकत नव्हते.

एकावेळी एका शिष्याने स्वामीजीला विचारले की, आपल्या गंगा स्नानाचा काय फायदा, आपण स्नान करण्यासाठी ब्राह्मण लोकांची मदत घेतात आणि परतताना इतर कोणत्याही जातीच्या व्यक्तीची. यामुळे तर स्नान केल्यानंतरही अपवित्र होते. स्वामीजी शिष्याला म्हणाले, वत्सा हा तुझा भ्रम आहे. स्नानामुळे तर केवळ माझ्या शरीराचा वरील मळ साफ होतो. शरीरातील मळ तर तसाच राहतो आणि तो मळ त्या व्यक्तीसोबत येण्याजाण्याने साफ होतो. ज्याला तू कनिष्ठ जातीचा समजतोस. स्वामीजींचे हे म्हणणे ऐकून शिष्य म्हणाला, मला काही समजले नाही. तेव्हा स्वामीजी म्हणाले, वत्सा मी मानवामानवात अंतर समजत नाही. माझ्यासाठी सर्व जाती-संप्रदाय समान आहेत. मी त्या कनिष्ठ जातींच्या लोकांना जवळ करुन संदेश देऊ इच्छित आहे आणि असे केल्यामुळे मन शुद्ध होते. दुसऱ्यापेक्षा आपण मोठे असल्याचा भाव मनात अहंकार निर्माण करतो आणि हा अहंकार मनुष्याच्या प्रगतीचा सर्वात मोठा अडथळा आहे. तोपर्यंत मनाचा अहंकार नष्ट होत नाही. तोपर्यंत मनुष्य कधीही शुद्ध होऊ शकत नाही. कोणी लहान-मोठे नसते तर केवळ मनाचा भाव आपल्याला लहान-मोठा बनवतो आणि लहान-मोठा भेदभाव नष्ट करणे हा माझा उद्देश आहे. स्वामीजीचे हे वचन ऐकून शिष्य त्यांच्या मार्गाने चालू लागला.

## उपदेशकथा

### जिभेचं बंधन व्यवहारबुद्धी

एका राजाच्या पदरी एक हुशार माळी होता. त्याचं उद्यान मोठं सुंदर असे. राजानं उद्यानात येण्याची इच्छा व्यक्त केली आणि काहीतरी वेगळं, नवलाचं पहायला मिळेल का असं माळ्याला विचारलं. माळ्यानं होकार दिला पण थोडी मधाची मागणी केली.

दोन-चार दिवसानं राजाची उद्यान भेट ठरली. या दोन दिवसात माळ्यानं गवताला मध फासून मधोमध टाकलं होतं आणि थोड्या अंतरावरही विखरून टाकलं होतं.

एरव्ही माणसाच्या वाऱ्यालाही न उभा राहणारा वातमृग त्या गवताच्या मधाच्या गोडीनं राजवाड्यातून उद्यानात आला होता. आणि शांतपणे गवत खात होता. माळ्यानं हे आश्चर्य राजाला दाखवलं. राजा म्हणाला, माणसासमोर कधीही न येणारा मृग केवळ रसतृष्णेनं आला. जिभेचं बंधन मोठं खरे!

कथा उपदेश : जिभेचं बंधन मोठं बळकट.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:पुनर्वसु ०९:३४:४३ |
| २८ फेब्रुवारी २०२५ | योग:सौभाग्य १७:०१:४८ |
| शनिवार | करण:बव ०९:३६:३७ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बालव २०:४३:२८ |
| फाल्गुन शके | सूर्य:कुम्भ |
| संवत्– १९४७ | चन्द्र:कर्क०३:५२:०८ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – रमजान |
| मास– फाल्गुन | तारीख – १० |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | राष्ट्रीय विज्ञान दिन |
| तिथि:द्वादशी २०:४३:२८ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 4 | 2 | | | |
| 4 | 1 | | | | 6 | 7 | | 3 |
| | | 6 | | | 5 | | 1 | |
| | 9 | | | | 3 | 2 | | 7 |
| 7 | 4 | | | 1 | | | 9 | 6 |
| 5 | | 8 | 9 | | | | 3 | |
| | 5 | | 6 | | | 3 | | |
| 1 | | 7 | 5 | | | | 4 | 2 |
| | | | 7 | 2 | 1 | | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८७२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 7 | 2 | 9 | 3 | 5 | 6 | 1 |
| 2 | 6 | 9 | 7 | 1 | 5 | 8 | 4 | 3 |
| 1 | 3 | 5 | 6 | 4 | 8 | 7 | 9 | 2 |
| 4 | 1 | 6 | 5 | 3 | 7 | 2 | 8 | 9 |
| 9 | 7 | 8 | 1 | 6 | 2 | 4 | 3 | 5 |
| 3 | 5 | 2 | 9 | 8 | 4 | 1 | 7 | 6 |
| 6 | 9 | 4 | 8 | 2 | 1 | 3 | 5 | 7 |
| 7 | 2 | 3 | 4 | 5 | 9 | 6 | 1 | 8 |
| 5 | 8 | 1 | 3 | 7 | 6 | 9 | 2 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ३६४ – व्हॅलेन्टिनियन पहिला यास रोमन सम्राट म्हणून मान्यता.
- १७८४ – जॉन वेस्लीने मेथोडिस्ट चर्चची स्थापना केली.
- १८४९ – अमेरिकेच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यांमध्ये नियमित जहाजसेवा सुरू. न्यूयॉर्कहून निघालेले एस. एस. कॅलिफोर्निया हे जहाज ४ महिने व २१ दिवसांनी सान फ्रांसिस्कोला पोचले.
- १८५४ – रिपन, विस्कॉन्सिन येथे अमेरिकन रिपब्लिकन पार्टीची स्थापना.
- १८६१ – कॉलोराडोला अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा प्रदेश म्हणून मान्यता.
- १८९७ – फ्रांसच्या सैन्याने मादागास्करची राणी रानाव्हलोना तिसरी हिला पदच्युत केले.
- १९२२ – इजिप्तला युनायटेड किंग्डम पासून स्वातंत्र्य.

### राष्ट्रीय

- २००२ – गुजरातमध्ये जातीय दंगली. ५५ मृत्यू.
- २००८ – महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे ज्येष्ठ चिरंजीव अमित देशमुख यांचा विवाह अभिनेत्री अदिती घोरपडे हिच्याशी ग्रँड हयात फाइव स्टार हॉटेलमध्ये संपन्न झाला.

### जन्म

- १९२६ – स्वेतलाना अलिलुयेवा, जोसेफ स्टालिनची मुलगीचे जन्म.
- १९५१ – भारतीय डावखोरा मध्यमगती गोलंदाज करसन घौरी याचा जन्म.

### निधन

- १६४८ – क्रिस्चियन चौथा, डेन्मार्कचे राजा यांचे निधन.
- १९४१ – आल्फोन्सो तेरावा, स्पेनचे राजा यांचे निधन.
- १९८६ – ओलोफ पाल्मे, स्वीडनचे पंतप्रधान यांचे निधन.

## : SMS :

1 village ki Aurat
Cheque Cash
Karne gai..
clerk: sign kro..
Aurat: kaise ?
Clerk : Jaise Khat k
last me likhti ho..
Aurat ne sign kiya..
'TOHAR MUNNE
KI AMMAA..'

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९.९ | २२.६ |
| अहमदनगर | २९.२ | २०.६ |
| अकोला | ३३.२ | २५.३ |
| अमरावती | ३१.८ | २४.९ |
| बीड | ३२.४ | २३.९ |
| भंडारा | ३१.४ | २१.८ |
| बुलढाणा | २७.७ | १७ |
| चंद्रपूर | ३१.९ | २४.७ |
| चेन्नई | ३४.४ | २६.४ |
| नवी दिल्ली | २८.२ | १७.४ |
| धुळे | ३२.१ | २३ |
| गोंदिया | २९.८ | २३.१ |
| जळगाव | ३२.९ | २१.७ |
| कोल्हापूर | ३०.१ | २१.१ |
| लातूर | ३०.४ | २३.२ |
| मुंबई | ३१.१ | २४.२ |
| नागपूर | ३१.१ | २३ |
| नांदेड | ३२.२ | २४.६ |
| नंदूरबार | ३०.३ | २२.१ |
| नाशिक | ३०.१ | १९.९ |
| पुणे | २९.३ | १८.१ |
| पंढरपूर | ३१.२ | २२.६ |
| सातारा | ३०.७ | १९.२ |
| सांगली | ३१.४ | २१.३ |
| सोलापूर | ३१.४ | २५.३ |
| वर्धा | ३२.१ | २४.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर संपत्ती संबंधात केलेली धावपळ फायदेशीर ठरेल. स्पर्धेत यश मिळेल.

**तुळ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील.

**वृषभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: दक्षिण कार्यसिद्धि झाल्याने आर्थिक क्षेत्रात आशाजनक बदल घडून येतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**मिथुन :** शुभ रंग:केसरी, अनुकूल दिशा:उत्तर कामाचे प्रस्ताव मिळतील. योजना कार्यान्वित होतील. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत.

**धनु :** शुभ रंग:पांढरा, अनुकूल दिशा:उत्तर बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टिपणाचे समाजात कौतुक होईल. सुखवस्तूंवर खर्च होईल.

**कर्क :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम कायदेशीर कामे पूर्ण होतील. अभ्यासात मन रमेल. कामातील विस्तार फायदेशीर ठरेल. रागावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** शुभ रंग:गुलाबी, अनुकूल दिशा:पूर्व कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील.


**सिंह :** शुभ रंग:हिरवा, अनुकूल दिशा:पूर्व नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.

**कुंभ :** शुभ रंग: हिरवा: शुभ दिशा:पश्चिम वैवाहिक जीवन आनंदी राहिल्याने कामात उत्साह राहिल. आरोग्याच्या समस्या दूर होतील.

**कन्या :** शुभ रंग:लाल, अनुकूल दिशा:पूर्व नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, अनुकूल दिशा:पूर्व कुटुंबातील व्यत्तिंफ्चे सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७३



### आडवे शब्द

१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर
१८. उष्ण
१९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

### उभे शब्द

१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक, १५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा
२५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका, ३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड
७६. पडसे

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वानगी ३.बातमीदार ७.चमचम १०.कव १०अ.ममता १२.नम कहराम १४.आडाखा बांधणे १७.मळ १८.काना १९.रचना २१.आपादमस्तक २३.भाकरी २५.रकाना २७.वीर २९.तडा ३०.जहाज ३२.रसद ३४.सालस ३६.जारणमारण ३८.मस ४०.बरकत ४१.गड ४२.खस ४३.काडीमोड ४४.गर ४५.अर्चना ४६.सरकार ४८.सहाणखोड ५०.आसपास ५१.जाण ५२.पतदार ५५.मोहनदास ५७.नजरानजर ६१.सतत ६३.नवी ६४.राखणदार ६७.लवकर ६८.रामदास ७१.वास ७२.लकवा ७३.कणीक ७४.खप ७६.रस्ता ७७.बाप्पा ७८.रवाळ ७९.सरबत

उभे उत्तर : १.वाकडातिकडा २.नवखा ३.बाता ४.मीन ५.दाम ६.रकमपात ७.सारा ८.मग ९.महिना १०.मध ११.मणेर १३.हळद १५.बांग १६.विनाकारण १८.काकवी २०.चर २२.मतलब २३.भातपोळी २४.वहाण २६.नारा २८.रजत ३०.जरड ३१.जमाखर्च ३३.दमडी ३५.सरदार ३६.जागरण ३७.रसना ३९.समोरासमोर ४३.कापूस ४४.गहाणखत ४५.अडत ४६.सधन ४६अ.कानस ४७.रक्षा ४८.सजा ४९.खोपट ५३.दानवीर ५४.सरसरीत ६१.सतलज ६२.तलवार ६३.नकटी ६५.खसखस ६६.दावा ६९.मकर ७०.सबळ ७३.कप्पा ७५.पर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 45 वर्षापासून राहत असलेले रहिवाशांना नोटीसाद्वारे घरे खाली करण्यास मज्जाव

पुणे (दैनिक संध्या) : श्रीरामपूर नगरपालिका हद्दीतील प्रवरा डावा कालवा परिसरातील 40 ते 45 वर्षापासून राहत असलेले तसेच सर्व रहिवासी पुरावे असलेल्या हजारो परिवारास बेलापूर रोड सिंचन शाखा श्रीरामपूर यांनी घरी खाली करण्या संदर्भात दिलेल्या अन्यायकारक नोटीसाविरोधात ॲड. राजेश भारस्कर यांच्या नेतृत्वात श्रीरामपूर येथे महात्मा गांधी पुतळा या ठिकाणी आमरण उपोषण सुरुवात केली आहे. श्रीरामपूर नगरपालिका हद्दीतील प्रवरा डावा कालवा परिसरात सुमारे 3000 ते 4000 परिवार गेले 40 ते 45 वर्षापासून राहत असून दहा ते बारा हजार व्यक्तींजवळ सण 1980 पासून मतदान कार्ड. रेशनिंग कार्ड. दाखले सहित सर्व शासकीय व स्थानिक पुरावे उपलब्ध असतानाही शाखा अधिकारी बेलापूर रोड सिंचन शाखा श्रीरामपूर या कार्यालयाने स्थानिक रहिवाशांना अगदी दहा ते बारा दिवसाच्या मुदतीच्या अन्यायकारक नोटीस देऊन घरी खाली करण्यास सांगितले आहे. सिंचन शाखा बेलापूर कार्यालयाने दिलेल्या या अन्यायकारक नोटीस विरोधात ॲड. राजेश भारस्कर यांच्या नेतृत्वात स्थानिक सर्व परिवारांनी महात्मा गांधी पुतळा या ठिकाणी आमरण उपोषण सुरुवात केली आहे. गेले 40 ते 45 वर्षापासून राहत असलेल्या सर्व रहिवाशांना दिलेल्या अन्यायकारक नोटीसा त्वरित रद्द करण्यात याव्यात. नागरिकांचे घरी त्वरित नियमित करण्यात यावीत या मागण्या ॲड राजेश भारस्कर व स्थानिक रहिवाशांच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनास श्रद्धा बर्वे. सामाजिक कार्यकर्ते नितीन बालकी. पत्रकार मनोज खोपडे. पत्रकार शंकर जोग. यांनी मार्गदर्शन करून सहकार्य केले.

### राज्य शासनाच्या ‘उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-2025’साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन,छायाचित्रे,वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च २०२६ असा आहे. स्पर्धकांनी जिल्हा माहिती कार्यालयाकडून येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अधिक माहिती व अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, अशी माहिती जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी दिली आहे.

### अन्न व औषध प्रशासन, पुणे यांची गुटखा-पानमसाला विरोधात कारवाई

■ ९२ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

पुणे (दैनिक संध्या) : अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे कार्यालयास प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीनुसार प्रतिबंधित अन्नपदार्थांवर धडक कारवाई करण्यात येऊन एकूण ९२ लाख ९८ हजार ८१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पहिल्या कारवाईत में. आझमी वेट ब्रिज, गट नं. ५७४/२०१६, महाळुंगे एमआयडीसी, ता. खेड, जि. पुणे येथे विक्री व वितरणासाठी साठवून ठेवलेला गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. या ठिकाणी बोलेरो मॅक्स पिकअप (क्र. MH-12XM-46908) वाहनासह एकूण ७९ लाख १७ हजार १३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी वाहन मालक सिराज नूर आलम व अज्ञात जागा मालक यांच्या विरोधात महाळुंगे पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. ०१३६/२०२६ नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दुसऱ्या कारवाईत आनंद सेल्स, थेरगाव, पिंपरी-चिंचवड येथे गुटखा व पान मसाला वाहतूक करणारे वाहन (क्र. MH-14-JP-0743) पकडण्यात आले. येथे १३ लाख ८० हजार ९५० रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला. वाहन मालक प्रज्वल सुदर्शन मुथा व रामस्वरूप यांच्या विरोधात वाकड पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. ००९१/२०२६ नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत सदर कारवाई करण्यात आली असून नागरिकांनी प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्रीबाबत माहिती मिळाल्यास प्रशासनास कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




### पुण्यातील “गौ टेक 2026” आत्मनिर्भर भारताला नवी दिशा देणारे

पुणे (दैनिक संध्या) : गौ आधारित उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, नवोन्मेष आणि उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने “गौ टेक 2026” या आंतरराष्ट्रीय शिखर परिषद व प्रदर्शनाचे आयोजन 20 मार्च ते 23 मार्च 2026 या कालावधीतॲग्रीकल्चर कॉलेज ग्राउंड, पुणे (महाराष्ट्र)येथे करण्यात येत आहे. हे आयोजन केवळ एक प्रदर्शन नसून गौ आधारित अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून भारताला आत्मनिर्भर आणि सुसंस्कृत बनविण्याच्या दिशेने एक व्यापक राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय अभियान आहे. “गौ टेक 2026” मध्ये देश-विदेशातील धोरणकर्ते, समाजसेवक शास्त्रज्ञ, उद्योगपती, स्टार्ट-अप्स, गुंतवणूकदार, शेतकरी, गौशाळा, विद्यापीठे, संत समाज, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या आयोजनात 300 पेक्षा अधिक स्टॉल्स, 10 हून अधिक विषयाधारित परिसंवाद, विशेष परिषद, B2B बैठका तसेच परदेशी प्रतिनिधींचा सहभाग असणार असून 5 लाखांहून अधिक अभ्यागत येण्याची शक्यता आहे. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्रभाई मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, स्टार्ट-अप इंडिया आणि व्होकल फॉर लोकल या दृष्टीकोनातून प्रेरणा घेऊन, आंतरराष्ट्रीय संस्था ग्लोबल कन्फेडरेशन ऑफ काउ-बेस्ड इंडस्ट्रीज (GCCI) यांच्या वतीने, महाराष्ट्र गौ सेवा आयोग आणि आर.आर. केबल यांच्या सहकार्याने आयोजित “गौ टेक 2026” आज केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर गौ-आधारित उद्योगांसाठीचे सर्वात मोठे व प्रभावी व्यासपीठ म्हणून उदयास येत आहे. हे आयोजन भारतीय संस्कृती, परंपरा, विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा सशक्त संगम असून, “ब्राऊन रिव्होल्यूशन (Brown Revolution)”च्या माध्यमातून सात्त्विक विकासाच्या दिशेने भारताला पुढे नेण्याचे कार्य करणार आहे.

# बांधकाम व रिअल इस्टेट नवकल्पनांसाठी ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’

पुणे (दै. संध्या) :

जवळपास चार दशकांचा वारसा असलेल्या अग्रगण्य EPC आणि रिॲल्टी क्षेत्रातील कंपन्यांपैकी एक वॅस्कॉन इंजिनिअर्स लिमिटेड (VASCONEQ) ने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे उत्कृष्टता केंद्राची उभारणी केली आहे. ही सुविधा सीओईपी कॅम्पसमधील निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये विकसित करण्यात आली असून एकूण बांधकाम क्षेत्र 18,000 चौ.फूट आहे. उत्कृष्टता केंद्राची निर्मिती बांधकाम, रिअल इस्टेट आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांशी संबंधित तंत्रज्ञानांच्या संशोधन, चाचणी आणि अंमलबजावणीस पाठबळ




देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून करण्यात आली आहे. या सुविधा केंद्राचा काही भाग CREDAI सोबत विकसित करण्यात येणार आहे. तर दुसऱ्या भागात इंडियन प्लंबिंग असोसिएशन (IPA) यांच्या सहकार्याने अत्याधुनिक प्लंबिंग लॅब उभारण्यात येणार आहे.

हे केंद्र लाईव्ह तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, पथदर्शी प्रकल्प, शैक्षणिक–औद्योगिक कार्यशाळा, संशोधन सहकार्य आणि ज्ञानाची देवाणघेवाण यांना सक्षम करेल. यामुळे विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना आणि संशोधकांना प्रत्यक्ष क्षेत्रातील उपाययोजन आणि सध्याच्या औद्योगिक पद्धतींचा अनुभव मिळेल. त्यायोगे शैक्षणिक संशोधन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील दुवा अधिक बळकट होईल. हे व्यासपीठ विकसक, वास्तुविशारद, EPC कंपन्या, अभियंते, सल्लागार, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, नगररचनाकार आणि सरकारी भागधारक यांना एकत्र आणेल. हे केंद्र शाश्वत आणि कारखान्यात पूर्वनिर्मिती करून साइटवर बसवले जाणारे बांधकाम साहित्य, प्रगत बांधकाम तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि मॉड्युलर प्रणाली, स्मार्ट पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि जल व्यवस्थापन उपाययोजना, BIM आणि डिजिटल साइट साधने, स्वयंचलन, विश्लेषण आणि हरित इमारत पद्धती अशा क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करेल.

हा उद्घाटन सोहळा आणि सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ येथून श्री. आर. वासुदेवन यांच्या पदवीधर तुकडीचा 50 वा वर्धापन दिन या गोष्टी देखील एकाच वेळी जुळून आल्या आहेत. माजी विद्यार्थ्यांच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्याची नोंद त्यायोगे होत असून संस्था आणि उद्योगक्षेत्र यांच्यातील सहकार्य अधिक दृढ होत आहे.

या प्रसंगी बोलताना वॅस्कॉन इंजिनिअर्स लिमिटेडचे संस्थापक आणि अध्यक्ष एमेरिटस श्री. आर. वासुदेवन म्हणाले, “सीओईपी येथील उत्कृष्टता केंद्र हे आमच्या संस्थेशी असलेल्या दीर्घकालीन संबंधांचे आणि उद्योग व शैक्षणिक क्षेत्रामधील मजबूत दुवे निर्माण करण्याच्या आमच्या उद्दिष्टाचे प्रतीक आहे. प्रकल्प अंमलबजावणीत अत्याधुनिक तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करत आहोत. बांधकाम पद्धतींमध्ये तंत्रज्ञान आणि डेटाचा वाढता वापर होत असताना हे केंद्र शिक्षण, चाचणी आणि वापर-उपयोजन यासाठी एक सामायिक व्यासपीठ म्हणून कार्य करेल.”



## स्वा. सावरकरांनी प्रत्यक्ष कृतीतून समरसतेचा मार्ग दाखवला

पुणे (दै. संध्या) :


एकात्मता आणि समरसतीची संकल्पना ही आपल्या देशाला श्रेष्ठ बनवणारी आहे. प्राचीन काळापासून संत, समाज सुधारक आणि महापुरुषांनी समाजातील भेदाभेद दूर करून बंधू भावाचा संदेश दिला आहे. याच परंपरेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे सामाजिक कार्य विशेष उल्लेखनीय ठरते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदू समाज संघटित करण्यासाठी केवळ विचार मांडले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीतून समरसतेचा मार्ग दाखवला, असे ग्राहक पेठेचे कार्यकारी संचालक व सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत पाठक यांनी सांगितले.

ग्राहक पेठेतर्फे स्वा. सावरकर आत्मार्पण दिनानिमित्त सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्राहक पेठेच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमाला नगरसेवक राघवेंद्र उर्फ बापू मानकर उपस्थित होते. सूर्यकांत पाठक म्हणाले, सन १९३१ मध्ये रत्नागिरी येथे पतित पावन मंदिर सर्व हिंदूंना खुले करण्यात आले. त्यामध्ये सावरकरांच्या प्रेरणेने व भागोजी यांच्या आर्थिक पाठिंबामुळे हे मंदिर उभे राहिले, असे सांगत विविध प्रकारचे सावरकरांचे कार्य त्यांनी उपस्थितांसमोर उलगडले. राघवेंद्र मानकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेले देव, देश, धर्मासाठीचे कार्य महान असल्याचे सांगितले.

## २४वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२६ मध्ये धर्मेंद्र यांना खास संगीत श्रद्धांजली

पुणे (दै. संध्या) :

भारतीय चित्रपटसृष्टीचा झगमगाट आणि भव्यता ‘मारुती सुझुकी प्रस्तुत 24वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स 2026’मध्ये पूर्णत्वाने चमकणार आहे. या संध्येमध्ये कलावंतांचे कौशल्य, भावना आणि चाहते व कलाकारांमधील नाते यांचा भव्य उत्सव साजरा केला जाईल. संगीताच्या सुरांनी रंगलेला हा सोहळा उंचावत असताना दिवंगत धर्मेंद्र यांची सदाबहार परंपरा मिथुन आणि पलक मुच्छल यांच्या खास संगीतात्मक श्रद्धांजलीतून मनोभावे साजरी केली जाणार आहे. त्यांच्या कारकिर्दीचा खरा आत्मा आणि प्रभाव या सादरीकरणातून सुंदरपणे प्रकट होईल. प्रेक्षकही या भव्य कार्यक्रमाचे प्रत्यक्ष साक्षीदार होण्यासाठी तिकिट बुक करून सहभागी होऊ शकतात. हे सादरीकरण गेल्या सहा दशकांतील त्या सिनेमाला उजाळा देईल. या काळाने प्रेक्षकांची मने जिंकली, अनेक पर्वे निश्चित केली आणि पिढ्यान्‌पिढ्या कलाकार व निर्मात्यांना प्रेरणा दिली. धर्मेंद्रजी फक्त एक सुपरस्टार नव्हते; तर ते



सिनेमाचे उबदार, निर्भय, करुणामय आणि अगदी खरे धडधडते हृदय होते. त्यांच्या अपार उदारतेमुळे आणि दयाळू स्वभावामुळे त्यांची परंपरा आजही पुढील पिढ्यांमध्ये जिवंत आहे. 2005 मध्ये झी सिने अ‍ॅवॉर्ड्समध्ये त्यांना लाइफटाईम अचिव्हमेंट अ‍ॅवॉर्ड देण्यात आला होता. त्या वेळी त्यांनी भावूक होऊन म्हटले होते, “मला खूप अ‍ॅवॉर्ड्स मिळत नाहीत, पण मिळाले की माझे चाहते स्वतःला माझ्यात पाहतात. आज जेव्हा मी हा अ‍ॅवॉर्ड हातात घेतो, तेव्हा मला माझे चाहते दिसतात, म्हणून ही संध्या मी माझ्या सर्व प्रिय चाहत्यांना समर्पित करतो.” या खास श्रद्धांजलीच्या सादरीकरणापूर्वी, मुंबईत झी तर्फे आयोजित पत्रकार परिषदेत मिथुन यांनी आपल्या भावना व्यक्त करत या परफॉर्मन्सबद्दल सविस्तर माहिती दिली. त्याने सांगितले, “यंदाच्या झी सिने अ‍ॅवॉर्ड्स 2026 मध्ये पलक आणि मी दिग्गज अभिनेते धर्मेंद्रजींना संगीतात्मक श्रद्धांजली अर्पण करणार आहोत. भारतीय चित्रपटसृष्टीतील अनेक अजरामर गाणी त्यांच्या वारशाचा भाग आहेत, ज्यामागे लक्ष्मीकांत–प्यारेलाल, मदन मोहन आणि महान पंचम दा यांसारखे कालातीत संगीतकार आहेत. माझे ध्येय म्हणजे धर्मेंद्रजींच्या गीतसंग्रहातून भारतीय संगीताचा इतिहास त्यांच्या परंपरेला साजेसा, अत्यंत सुंदर पद्धतीने सादर करणे हे आहे.”

धर्मेंद्रजींचा अभिनयप्रवास त्यांच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वामुळे पडद्यावर उजळून निघणाऱ्या त्यांच्या हसण्यापासून ते संवादांपेक्षाही खोल अर्थ सांगणाऱ्या त्यांच्या शांत क्षणांपर्यंत जिवंत झाला होता. त्यांना अविस्मरणीय बनवणारी गोष्ट फक्त त्यांची कला नव्हती, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील धैर्य, प्रेम आणि जमिनीवरची विनम्रता यांचा सुरेख संगम होता. ही श्रद्धांजली आणि त्यांची परंपरा आपल्याला आठवण करून देईल की व्यक्ती नसली तरी त्या व्यक्तीचे कलाप्रेम जीवंत राहते. जे त्यांचे सिनेमे पाहत मोठे झाले, तसेच ज्यांना आज त्यांच्या कामाची नव्याने ओळख होत आहे अशा सर्वांसाठी ही श्रद्धांजली हे सिद्ध करणार आहे की दंतकथा कधीच नाहीशा होत नाहीत तर त्या प्रत्येक सुरात, प्रत्येक दृश्यात आणि मनापासून सांगितलेल्या प्रत्येक कथेत जीवंत राहतात.

चमचमत्या सिताऱ्यांसह सजलेला ‘मारुती सुझुकी प्रस्तुत 24वे झी सिने अ‍ॅवॉर्ड्स 2026’चा सोहळा 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च रोजी मुंबईतील एनएससीआय डोम येथे भव्य पद्धतीने रंगणार आहे. हा सोहळा मारुती सुझुकी यांच्या प्रस्तुततेखाली होणार असून, हेल एनर्जी ड्रिंक ऊर्जा भागीदार तर राजधानी डाळ, लॉरिअल पॅरिस ग्लायकॉलिक ग्लॉस, कॅडबरी डेअरी मिल्क आणि बालाजी वेफर्स हे विशेष भागीदार म्हणून सहभागी आहेत.

## औद्योगिक क्षेत्राला अपेक्षित कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम सारथीने सुरू करावेत

पुणे (दै. संध्या) :

■ ना. विखे पाटील : मराठा आरक्षण उपसमितीची बैठक संपन्न

उद्योजकांच्या संघटनांशी संपर्क ठेवून औद्योगिक व सेवा क्षेत्रात मागणी असलेल्या कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम सारथीने सुरू करावेत, यासाठी नामांकीत प्रशिक्षण संस्थाचे मार्गदर्शन घेण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. मंत्रालयात डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सारथी संस्थेच्या संचालकांची तसेच शासनाच्या संबंधित विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीसाठी सारथी संस्थेचे संचालक श्री.मधुकर कोकाटे, श्री.उमाकांत दांगट, संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक सुरज



मांढरे व इतर अधिकारी उपस्थित होते. उपसमितीचे अध्यक्षपद स्विकारल्यापासून संपन्न झालेली आजची ही नववी बैठक होती. सारथी संस्थे मार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना उपक्रमांचा सविस्तर आढावा सारथी संस्थेला उपलब्ध होत असलेला निधी याचा सविस्तर आढावा मंत्री विखे पाटील यांनी सदर बैठकीमध्ये घेतला. सारथी संस्थेच्या माध्यमातून सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक सुरज मांढरे यांनी सादर केली. बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, समाजातील युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य प्रशिक्षण उपक्रम सुरु करणे अत्यंत गरजेचे आहे. सारथी संस्थेने यामध्ये पुढाकार घेतल्यास समाजातील युवक- युवतींना त्याची मोठी मदत होईल. सद्यपरिस्थितीत औद्योगिक तसेच सेवा क्षेत्राला आवश्यक असलेले मनुष्यबळ या कौशल्य विकास कार्यक्रमातून उपलब्ध होवू शकते यासाठी कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत राबविण्याच्या दृष्टीने सारथी संस्थेने प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या. सारथी संस्थेचे उपक्रम योजनांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यकत ते सर्व पाठबळ देण्याबाबत त्यांनी सारथी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना आश्वासीत केले.राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीने पुर्व प्रशिक्षणा करीता युपीएसी करीता शंभर जागावरून चारशे तर एमपीएसी करीता ४००जागांवरून १हजार जागा निर्माण करण्यास मान्यता दिली असल्याची माहीती मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिली. राज्य सरकारने सन २०२५-२६ आर्थिक वर्षात ५१५ कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी ४४२ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला असून, पुरवणी मागण्यां मध्येही ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे विखे पाटील म्हणाले.

## गिर्यारोहणाने मुलांमध्ये आत्मविश्वास आणि समस्यांशी सामना करण्याची क्षमता

पुणे (दै. संध्या) :


पालकांच्या अति-रक्षणामुळे मुलांमध्ये छोट्या समस्यांना सामोरे जाण्याची क्षमता कमी होत आहे. या आव्हानावर मात करण्यासाठी गिर्यारोहण अत्यंत उपयुक्त ठरते. चढ उतार करताना मुलं केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम होत नाहीत, तर जीवनातील चढ उतार पचवण्याची मानसिक ताकदही विकसित करतात आणि स्वतःच्या क्षमतेची जाणीव करून घेतात, असे मत गिर्यारोहक उपेश झिरपे यांनी व्यक्त केले. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, पुण्याच्या वतीने पोवाडा प्रशिक्षण वर्गात सिंहगडावर सहस्त्रारोहण करणारा सह्याद्रीचा मावळा लक्ष्मीकांत सासवडे यांचा विशेष सन्मान हस्ते ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रबोधनाचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे, प्रा.संगीता मावळे, अरुणकुमार बाभुळगावकर, शाहीर गणेशदादा टोकेकर, आप्पा वनकर आदी उपस्थित होते. रमणबाग प्रशालेतील कलाग्राम येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. उमेश झिरपे म्हणाले, आज सिंहगडावर लोक केवळ पिठलं-भाकरी खाण्यासाठी जातात. तिथे कोणाची समाधी आहे, याची देखील माहिती अनेकांना नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रत्येक गड-किल्ला शौर्याचे प्रतीक आहे. त्या भूमिची पवित्र माती मस्तकी लावा, असेही त्यांनी सांगितले. लक्ष्मीकांत सासवडे म्हणाले, आपण स्वतः जेव्हा गडांची चढाई करतो, तेव्हा त्याचे सौंदर्य समजते. मी जेव्हा सिंहगडाची चढाई सुरू केली, तेव्हा प्रत्येक वेळी त्याचे नव्याने सौंदर्य मला दिसले.


# सोनी सबचे कलाकार होळीचा उत्साह आनंदाने साजरा करतात

पुणे (दै. संध्या) :

होळी हा केवळ रंगांचा उत्सव नाही. तो आनंद, एकत्रितपणा आणि आपल्या सभोवतालच्या लोकांसोबत असण्याच्या साध्या सुखाचा उत्सव आहे. रंगांच्या खेळांपासून ते हवेत घुमणाऱ्या हास्यापर्यंत, बालपणीच्या आठवणी, कौटुंबिक मेळावे, पार्श्वभूमीवर वाजणारे संगीत आणि सणाच्या पदार्थांनी भरलेली ताटे. हा असा दिवस असतो जिथे भेदभाव नाहीसे होतात आणि ऊब व आपुलकी केंद्रस्थानी येते. यंदा सोनी सबवरील कलाकार करुणा पांडे, दीक्षा जोशी, ऋषी सक्सेना आणि श्रेनू परिख यांनी त्यांच्या होळीच्या आठवणी आणि परंपरा शेअर केल्या आहेत, ज्यामुळे हा उत्सव वर्षानुवर्षे खास ठरतो.

करुणा पांडे, 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत करुणा पांडेची भूमिका





साकारत, सांगतात, “माझ्या शालेय जीवनातील सर्वात मजेदार होळीच्या आठवणींपैकी एक म्हणजे जेव्हा माझे वडील शिलाँगला पोस्टेड होते. आईने आम्हाला फक्त एक-दोन तास खेळायला सांगितले होते, पण आम्ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत साजरा केला. जेव्हा आई-वडील आम्हाला शोधायला आले, तेव्हा त्यांना स्वतःचे मूल ओळखता येत नव्हते. आम्ही काळ्या आणि हिरव्या रंगात पूर्णपणे माखलेले होतो आणि लहान भुतांसारखे दिसत होतो! आजही ती आठवण मला हसवते. तो बेफिकीर आनंदच माझ्यासाठी होळीचा अर्थ आहे.”

ऋषी सक्सेना, 'इत्ती सी खुशी' मालिकेत संजयची भूमिका साकारत, सांगतात, “लहानपणी होळी हा एकमेव दिवस होता जेव्हा आम्हाला पूर्ण गोंधळ घालण्याची परवानगी होती आणि त्यासाठी ओरडा मिळत नव्हता. मला स्पष्ट आठवते की कोणत्या मित्राला आधी लक्ष्य करायचे याची योजना आखत होतो आणि पळून जाण्याचे नाटक करून परत रंगांनी भरलेली बादली घेऊन येत होतो. दिवसाच्या शेवटी कोणीही स्वतःसारखे दिसत नव्हते आणि खरी झगडण सुरू व्हायची घरी. रंग काढण्याची जी दिवसन्‌दिवस जात नसे. मला वाटते मी रंग लावण्यापेक्षा रंग काढण्यात जास्त वेळ घालवला आहे! पण तितक्याच स्पष्टपणे मला आठवते की घरी परतल्यावर ताज्या गुजियांचा सुगंध दरवळत असे. उत्तर भारतात गुजिया शिवाय होळी अपूर्ण वाटते. आजही होळीचा विचार केला की त्या बेफिकीर गोंधळामुळे हसू येते. हा असा उत्सव आहे जिथे तुम्हाला पूर्णपणे मोकळे होण्याची आणि पुन्हा एकदा बालपण जगण्याची संधी मिळते.”

दीक्षा जोशी, 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत दीप्तीची भूमिका साकारत, सांगतात, ““गेल्या काही वर्षांपासून मी मुंबईत होळी साजरी करत आहे. आम्ही सहसा माध आयलंडला, राहेजा टाउनशिपमध्ये जातो, जिथे आमचे काही जवळचे मित्र एकत्र येतात. तिथे नेहमीच रंग, संगीत आणि हास्याने वातावरण भरलेले असते. पण मला घरच्या घरी बनवलेल्या गुजिया आणि पुएची आठवण येते, विशेषतः पहाडी कुटुंबे होळी आणि दिवाळीत ज्या पद्धतीने ते बनवतात. त्या चवीत एक वेगळेच आकर्षण असते जे तुम्हाला लगेच भूतकाळात घेऊन जाते. मला रंग खेळायला आवडते, पण मी हर्बल रंगांना प्राधान्य देते आणि उत्सव आनंददायी तसेच सन्मानपूर्वक साजरा व्हावा असे मला वाटते. माझ्यासाठी होळी म्हणजे मजा करणे पण त्याचबरोबर उत्सवाची ऊब आणि प्रतिष्ठा जपणे.”

श्रेनू पारिख, 'गणेश कार्तिकेय' मालिकेत पार्वतीची भूमिका साकारत, सांगतात, “माझ्यासाठी होळी म्हणजे नेहमी घर आणि पार्श्वभूमीवर जोरात वाजणारे संगीत. वडोदऱ्यात होळी ही केवळ चेहऱ्यावर रंग लावण्याची गोष्ट नव्हती, तर आठवड्यांपूर्वीपासून दिवसाची योजना आखण्याची होती. माझे मित्र आणि मी काय घालायचे ते ठरवत असू, हे माहीत असूनही की ते एका तासात खराब होणार आहे. दुपारपर्यंत आम्ही सर्व ओळखता न येण्यासारखे होत असू, एकमेकांवर हसत, गोडधोड शेअर करत आणि दिवस संपवण्यास नकार देत. मला अजूनही आठवते की घरी परतताना मी थकलेली असे, केसांमध्ये रंग दिवसन्‌दिवस जात नसे. गालांवरील हट्टी गुलाबी रंग जणू सन्मानचिन्हासारखा वाटत असे. आजही होळी मला त्या शुद्ध, बंधनमुक्त आनंदाची आठवण करून देते.” इत्ती सी खुशी, गणेश कार्तिकेय आणि पुष्पा इम्पॉसिबल पाहण्यासाठी फक्त सोनी सबवर.



# ब्लू ओशन कॉर्पोरेशनतर्फे आंतरराष्ट्रीय HR परिषदेचे आयोजन

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

जागतिक मानवी संसाधन क्षेत्रातील आघाडीची संस्था Blue Ocean Corporation यांनी नवी दिल्ली येथे इंटरनॅशनल ह्युमन रिसोर्स कॉन्फरन्स (IHRC) चे भारतातील पहिले यशस्वी आयोजन केले. HR Certification Institute यांच्या सहकार्याने झालेल्या या परिषदेत ५०० हून अधिक वरिष्ठ HR नेते, उद्योगतज्ज्ञ व धोरणकर्ते सहभागी झाले.

परिषदेतील प्रमुख भाषणात HRCIच्या सीईओ Amy Dufrane यांनी भारताची जागतिक टॅलेंट इकॉनॉमीतील वाढती भूमिका अधोरेखित केली. ब्लू ओशनच्या बोर्ड सदस्य व माजी क्रिकेटपटू Sourav Ganguly यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे HR समुदायाला प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या. या वेळी 'Education for All' उपक्रमाचा विस्तार जाहीर करत ब्लू ओशनने आर्थिक अडथळे दूर करून जागतिक दर्जाच्या प्रमाणपत्र व कौशल्य प्रशिक्षणासाठी शिष्यवृत्ती वाढवण्याची घोषणा केली. तसेच Internshub या नॉन-प्रॉफिट प्लॅटफॉर्मद्वारे संरचित इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. परिषदेला NITI Aayog आणि AICTE चे वरिष्ठ प्रतिनिधीही उपस्थित होते. देशभरातील प्रमुख शहरांमध्ये विस्तार करण्याची महत्त्वाकांक्षी योजना देखील जाहीर करण्यात आली. IHRC दिल्लीमुळे भारताच्या मानव संसाधन क्षमतेला जागतिक व्यासपीठ मिळाले असून, ब्लू ओशन कॉर्पोरेशनची जागतिक नेतृत्वभूमिका अधिक बळकट झाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### कूपर कॉर्पोरेशन एसीएमए बेस्ट एचआर स्पर्धेत यशस्वी; सर्वोच्च सन्मान



पुणे (दैनिक संध्या) : कूपर कॉर्पोरेशन ही इंजिन, इंजिनचे भाग आणि जनरेटर तयार करणारी जागतिक स्तरावर प्रसिद्ध कंपनी असून, कंपनीला मानव संसाधन (एचआर) विकास क्षेत्रात केलेल्या नाविन्यपूर्ण कामगिरीसाठी एसीएमएच्या 17व्या वार्षिक एचआर समिट (पश्चिम विभाग) मध्ये गौरवण्यात आले. या स्पर्धेत देशभरातील 18 टॉप कंपन्यांच्या टीम्सशी स्पर्धा करून, कूपर कॉर्पोरेशनने एसीएमएच्या सहाव्या बेस्ट एचआर प्रॅक्टिसेस स्पर्धेत फर्स्ट रनर-अपचा मान मिळवला. या शिखर परिषदेचा विषय होता "फ्युचर-रेडी एचआर: लोक, तंत्रज्ञान आणि प्रतिभा यांना आकार देणे." या कार्यक्रमात ऑटोमोबाईल क्षेत्रातील आघाडीचे उद्योग तज्ज्ञ, धोरणकर्ते आणि एचआर व्यावसायिक सहभागी झाले होते. या कार्यक्रमात एचआर क्षेत्रातील बदल, ईएसजीचा समावेश आणि बदलत्या कामकाजाच्या वातावरणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (आर्टिफिशियल इंटेलिजेंसचा) वापर कसा करता येईल यावर सखोल आणि विचारप्रवर्तक चर्चा झाली. यावेळी फारुख एन. कूपर, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, कूपर कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड यांनी आपला आनंद व्यक्त करताना सांगितले, "एसीएमए बेस्ट एचआर प्रॅक्टिसेस स्पर्धेत मिळालेला हा सन्मान आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. 'ई-एकलव्य' हा उपक्रम आमच्या या विश्वासाचे प्रतीक आहे की तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण घेणे हे भविष्यासाठी सक्षम संस्था उभारण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आमचे कर्मचारी ही आमची सर्वात मोठी ताकद आहेत. अशा प्रकारच्या उपक्रमामुळे आमच्या कर्मचाऱ्यांचे कौशल्य सतत सुधारते, त्यांच्या क्षमता वाढतात आणि बदलत्या उद्योग वातावरणात स्पर्धात्मक राहता येते. मी आमच्या एचआर आणि प्रशिक्षण टीमचे त्यांच्या मेहनत आणि नाविन्यपूर्ण कार्यासाठी मनापासून अभिनंदन करतो." "ई-एकलव्य" उपक्रम आणि त्याअंतर्गत विकसित केलेल्या डिजिटल लर्निंग मॅनेजमेंट सिस्टम (एलएमएस) च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी हा पुरस्कार देण्यात आला. ही प्रणाली चीफ ह्यूमन रिसोर्स ऑफिसर नितीन देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली तयार केली गेली, ज्याचा उद्देश प्रशिक्षण आणि विकास प्रक्रिया एकसमान, सोपी आणि अधिक प्रभावी करणे हा होता.

# क्रिकेट स्तुतीगीताद्वारे एशियन पेंट्सने सजीव केले क्रिकेटचे रंग

## सुनिधी चौहान आणि विशाल दादलानी यांच्या सहभागाने प्रत्येक भारतीय घरास बांधणाऱ्या अनेक रंगांचा आनंद साजरा करणारे सांगितिक अभिवादन

**पुणे (दै. संध्या) :**

भारतात, क्रिकेटचा खेळ केवळ एक क्रिडाच नाही. तो लोकांना अभिमान, आशा आणि उत्साहाच्या मिलापाने एकत्र आणतो. एशियन पेंट्सच्या रंग दे इंडिया (क्रिकेट स्तुतीगीत)च्या लॉंचद्वारे एकजुटीची भावना जागृत होते - जे प्रत्येक भारतीय घराचा प्राण असलेल्या क्रिकेटचे रंग, भावना आणि एकजूट साजरा करणारी शक्तिशाली सांगितिक अभिव्यक्ती आहे.




जयघोषाच्या स्वरांनी दुमदुमत हे दिवाणखान्यांना लघु स्टेडियम आणि बाल्कन्यांचे रूप देते. हे स्तुतीगीत सामन्याच्या दिवसांचा आनंद आणि उत्कटता व्यक्त करते आणि विविध प्रदेश, भाषा आणि परंपरांमधील चाहत्यांच्या पिढ्यांना बांधते.

एशियन पेंट्स आणि क्रिकेट दोन्हीही भारताचे संस्मरणीय क्षण आणि आठवणी रंगवतात. एकत्रितपणे, ते 1.4 अब्ज हृदयांना एकत्र आणणारा एक मजबूत भावनिक बंध निर्माण करतात.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) सोबत भारतीय स्थानिक क्रिकेटचा अधिकृत रंग भागीदार या नात्याने, एशियन पेंट्सने रंगाचे-नेतृत्व, आणि चाहत्यांना प्राधान्य देऊन खेळाशी असलेले आपले संबंध सातत्याने दृढ केले आहेत. हे स्तुतीगीत रंग हा भावनांची अभिव्यक्ती आहे आणि लोकांना जवळ आणणारी शक्ती आहे या ब्रँडच्या विश्वासास हे गाणे प्रतिबिंबित करते.

"रंग दे - मोहे जीत के रंग में रंग दे" हे गीत एशियन पेंट्सने साजऱ्या केलेल्या क्रिकेट, रंग आणि उत्साह या भावना एकत्र आणतो.

हे उच्च-ऊर्जेचे स्तुतीगीत ऐकण्याइतकेच अनुभवता देखील येईल अशा प्रकारे डिझाइन केलेले आहे. हे आकर्षक, उत्साहवर्धक आणि अभिमानाने भरलेले आहे, अगदी सामन्याच्या दिवसातील भावनांसारखे. याचे संगीत समीर उद्दिन यांनी रचले आहे आणि सुनिधी चौहान आणि विशाल ददलानी यांनी ते गायले आहे. त्यांचे दमदार आणि ऊर्जेने ओतप्रोत स्वर या गीतास अविस्मरणीय बनवतात. हा एक असा ट्रॅक आहे जो चाहते सामन्यादरम्यान गुणगुणतील, वॉच पार्ट्यांमध्ये वाजवतील आणि खेळ संपल्यानंतर दीर्घ काळ लक्षात ठेवतील, ज्यामुळे तो भारताच्या क्रिकेट उत्सवाचा भाग बनेल.

ही चित्रफित भारतीय जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असलेले खास क्षण, परंपरा आणि आठवणी दाखवते. हे गीत देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातील चाहत्यांना साजरे करते आणि क्रिकेट प्रदेश, वय आणि पार्श्वभूमींच्या मर्यादा ओलांडून लोकांना कसे जोडते हे दाखवते. सृजनशील भागीदार किनेक्टच्या सहभागाने तयार केलेली ही मोहीम नियमित क्रीडा भागीदारीपलीकडे जाते आणि भारताच्या क्रिकेट भावनेचा उत्सव बनते ज्याचा उद्देश चाहत्यांच्या घरात आणि हृदयात वास्तव्य करावे हा आहे.

> या स्तुतीगीताबद्दल बोलताना, किनेक्टचे सीसीओ नेव्हिल शाह म्हणाले, "एशियन पेंट्ससाठी रंग म्हणजे केवळ सजावट नव्हती ती अभिव्यक्ती आहे. भारतीय रंग भागीदार या नात्याने इंडिया एक स्तुतीगीत तयार करणे सहजगत्या जाणवले. या क्रिकेट हंगामात भारतातील दिवाणखान्यांत प्रवेश करण्याचा आमचा हा एक मार्ग होता, ब्रँड या नात्याने नाही तर खेळामुळे व्यक्त होणाऱ्या भावनांच्या लाटांचा आनंद साजरा करणारा म्हणून.

या मोहिमेबद्दल बोलताना, एशियन पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ अमित सिंगल म्हणाले,

"क्रिकेटमध्ये भारताचे विविध प्रदेश आणि पिढ्यांना एकत्र आणण्याची दुर्मिळ आणि शक्तिशाली क्षमता आहे. एशियन पेंट्समध्ये, आमचा नेहमीच विश्वास आहे की रंग सौंदर्यशास्त्राच्या पलीकडे जातो; तो भावनांची एक अभिव्यक्ती आहे. रंग क्षेत्रातील प्रणेते या नात्याने, शब्दांच्या पलीकडे असलेल्या भावनांना रंग कसे जिवंत करू शकतो याचा आम्ही शोध घेत राहतो. हे स्तुतीगीत लाखो भारतीय घरांमध्ये क्रिकेटचे वेड चेतवणाऱ्या भावनांना आमची मानवंदना आहे, जे एक गीत, एक रंग, एक जल्लोष अन सर्वांचा एका वेळी हृदयाचा एकच ठोका या द्वारे राष्ट्राला एकत्र आणते."

# अपघात धुक्याने झाला की धोक्याने?

**मुंबई (दै. संध्या) :**

अजित पवारांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर, त्या घटनेबद्दल अनेक शंका-कुशंका व्यक्त होत आहेत. याबाबत आमदार श्री. रोहित पवार हे पोलीस स्थानकांत तक्रार नोंदवून घ्यायला गेलेले असताना, त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिला गेला. पोलिसांवर एफआयआर नोंदवून न घेण्यासाठी सरकारकडूनच दबाव आणला गेला असं दिसतंय. एफआयआर नोंदवून न घेण्यासाठी सरकार दबाव का टाकतंय? एफआयआर नोंदवून घेतलाच पाहिजे असे सक्त निर्देश असताना जर एका आमदाराची तक्रार नोंदवून घेतली जात नसेल तर मग सामान्य माणसांचं काय होत असेल ? अजित पवारांच्या बाबतीत जे घडलं ते अतिशय दुर्दैवी आहे, अशा घटनेनंतर जर त्यांच्या घरच्यांच्या मनात काही शंका असेल आणि त्यांनी याचा तपास व्हावा अशी मागणी पोलिसांकडे केली आणि त्यावर सरकार अजित पवारांसारख्या नेत्याच्या बाबतीत सुद्धा, पोलिसांनी साधा एफआयआर नोंदवून घेऊ नये यासाठी दबाव टाकत असेल तर यात नक्की काय काळंबेरं आहे हे जनतेला कळलंच पाहिजे.असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रसिद्धीस पत्रकात म्हटले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालयात 'नेटवर्क्स ऑफ द पास्ट' दालन सुरू

**मुंबई (दै. संध्या) :**

छत्रपती शिवाजी महाराज वस्तूसंग्रहालय (CSMVS) येथे 'नेटवर्क्स ऑफ द पास्ट: अ स्टडी गॅलरी ऑफ इंडिया अँड द एन्शिएंट वर्ल्ड' हे दालन सुरू झाले आणि भारताच्या सांस्कृतिक विश्वात एक नवा आयाम जोडला गेला आहे . सुमारे ५,००० वर्षांपूर्वी प्राचीन जग व्यापार, लेखन, धर्म, कला आणि विचारांच्या माध्यमातून कशाप्रकारे परस्परांशी जोडले गेले होते, याचे हे दालन अत्यंत प्रभावी दर्शन घडवते. चार वर्षांच्या प्रयत्नांनंतर साकारलेल्या या दालनात भारतातील व जगभरातील अग्रगण्य आंतरराष्ट्रीय स्तराच्या १५ संग्रहालयांकडून दीर्घकाळासाठी कर्ज स्वरूपात मिळालेल्या ३०० मूळ पुरातत्त्वीय वस्तू एकत्र पाहायला मिळतात.



संग्रहालयातील या दालनात भारत, इजिप्त, मेसोपोटामिया, ग्रीस, रोम, पर्शिया आणि चीन या प्राचीन संस्कृतींच्या कथा उलगडतात. या प्रदर्शनात अविभाजित भारतातील सर्वात प्राचीन हडप्पा (सिंधू-सरस्वती) संस्कृतीचाही समावेश आहे. येथे असणारे धोलावीरा या प्राचीन शहराचे बारकाईने साकारलेले मॉडेल या कथानकाला आधार देते. सुरुवातीच्या काळात भारतीय शहरांची असणारी रचना, त्या शहरांमधील प्रशासन, ती शहरं कशी टिकवली गेली, हे अत्यंत व्यापक स्वरूपात याठिकाणी मांडण्यात आले आहे. या दालनात शिल्पे, शिलालेख, आज्ञापत्रे, नाणी, चित्रकला, प्राचीन समाधीस्थळांतील वस्तू, दागिने, समाधीचे सूक्ष्म मॉडेल्स, जागतिक स्तरावरील मातीची भांडी आणि प्रतिकृतींसह व्यक्तिचित्रे यांचा समावेश आहे. अभ्यास आणि ऐतिहासिक अनुभवासाठी ही प्राथमिक ऐतिहासिक साधने समृद्ध स्रोत ठरत आहेत. या दालनांमधील वस्तू एकत्रितपणे पाहिल्यास ५,००० वर्षांपूर्वीचे जग किती परस्परसंलग्न होते, हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे व्यापार, तंत्रज्ञान, श्रद्धा, कलाप्रवाह आणि शिक्षणकेंद्रांमुळे जग एकमेकांशी जोडलेले हे देखील स्पष्ट होते.

# जागतिक प्रोटीन दिनानिमित्त आयबी ग्रुपची देशव्यापी मोहीम; २,५०० हून अधिक तहसीलांत जनजागृती

**पुणे (दै. संध्या) :**

जागतिक प्रोटीन दिनानिमित्त देशातील अग्रगण्य कृषी-अन्न कंपनी IB Group यांनी "हर घर हर दिन चिकन प्रोटीन" या घोषवाक्याखाली व्यापक देशव्यापी जनजागृती मोहीम राबविली. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत २० राज्यांतील २,५०० हून अधिक तहसीलांमध्ये ही मोहीम एकाच वेळी पार पडली. महिला आणि मुलांमध्ये आढळणाऱ्या ७३ टक्के प्रोटीन कमतरतेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

आकडेवारीनुसार देशातील दर दहा पैकी सात महिला व मुले पुरेशा प्रमाणात प्रोटीन घेत नाहीत.




ही बाब गंभीर पोषण समस्येचे स्वरूप धारण करत असल्याने ग्रामीण व अर्ध-शहरी भागांमध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली.

कंपनीच्या पथकांनी गाव व तहसील स्तरावर भेटी देत सरपंच, ग्रामप्रमुख व स्थानिक मान्यवरांच्या सहकार्याने जनजागृती बैठका घेतल्या. या बैठकीत संतुलित आहारात प्रोटीनचा नियमित समावेश किती महत्त्वाचा आहे, याबाबत माहिती देण्यात आली.

मुलांच्या योग्य शारीरिक वाढीसाठी आणि मेंदूच्या विकासासाठी दररोज २५ ते ५० ग्रॅम प्रोटीन आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. महिलांसाठी रोगप्रतिकारक शक्ती सुदृढ ठेवण्यासाठी ५० ते ६० ग्रॅम, तर पुरुषांसाठी ५५ ते ७० ग्रॅम प्रोटीनची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी अनेक ठिकाणी कोंबडीच्या मांसापासून तयार होणाऱ्या पौष्टिक व परवडणाऱ्या पदार्थांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. ग्रामीण कुटुंबांना समजावून सांगण्यात आले की १०० ग्रॅम कोंबडीच्या मांसामध्ये सुमारे २७ ग्रॅम उच्च दर्जाचे प्रोटीन असते, जे दैनंदिन आहारात सहज समाविष्ट करता येते.

कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बहादूर अली यांनी सांगितले की, या अभियानाचा उद्देश देशातील प्रत्येक कुटुंबापर्यंत प्रोटीनचे महत्त्व पोहोचवणे हा आहे. प्रोटीनची कमतरता विशेषतः महिला व मुलांसाठी गंभीर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. निरोगी जीवन, सक्षम शरीर आणि सर्वांगीण विकासासाठी पुरेसे प्रोटीन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रात अकोला, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ, कोल्हापूर, उस्मानाबाद, पुणे, रायगड, सांगली, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार, पालघर, ठाणे, हिंगोली, नांदेड, परभणी, जालना, औरंगाबाद, बीड आणि लातूर अशा २९ जिल्ह्यांतील विविध तहसीलांमध्ये पथकांनी दौरे केले.

या मोहिमेदरम्यान १ लाख ५५ हजार ८०० नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला. देशभरात २४ लाखांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचत ही मोहीम तळागाळातील सर्वात मोठ्या प्रोटीन जनजागृती उपक्रमांपैकी एक ठरली आहे.

"हर घर हर दिन चिकन प्रोटीन" ही मोहीम केवळ जनजागृतीपुरती मर्यादित न राहता प्रोटीन-सुरक्षित आणि सक्षम भारत घडविण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

# टाटा पॉवर रिन्युएबल्सचा 'स्केल सस्टेनेबल' उपक्रम

## पुण्यात उद्योगांना सौर व साठवण उपायांचा मार्ग

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**




Tata Power Renewable Energy Limited (TPREL) ने पुण्यात 'Scale Sustainable with Tata Power' या सीअँडआय ग्राहक-केंद्रित उपक्रमाचे आयोजन केले. ऊर्जा-केंद्री औद्योगिक परिसंस्थेला अखंड सौर आणि बॅटरी ऊर्जा साठवण उपाय स्वीकारण्यासाठी सक्षम करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. हा उपक्रम पोलाद, ऑटोमोटिव्ह व ऑटो-संबंधित उद्योग, डेटा सेंटर, अभियांत्रिकी आणि उत्पादन क्षेत्रासाठी विशेषतः तयार करण्यात आला आहे. जिथे ऊर्जा खर्च बचत, शाश्वतता अंगीकार आणि दीर्घकालीन नफा संरक्षण हे धोरणात्मक प्राधान्यक्रम आहेत.

**औद्योगिक ग्राहकांसाठी ठोस आर्थिक लाभ**

- TPREL च्या सोल्यूशन्समुळे औद्योगिक ग्राहकांना:
- ३–५ वर्षांत गुंतवणुकीची परतफेड
- सुधारित IRR व वाढीव EBITDA
- ग्रीडवरील अवलंबित्वात कपात
- दरातील अस्थैर्यापासून संरक्षण
- शून्य-कार्बन व ESG वचनबद्धता पूर्ण करण्यास मदत
- २५+ वर्षांच्या मालमत्ता आयुष्यासह दीर्घकालीन बचत

**महाराष्ट्र: विकेंद्रीकृत स्वच्छ ऊर्जेसाठी अग्रणी**

आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या नवमाहीत TPREL ने महाराष्ट्रात १२६.३३ मेगावॅट रूफटॉप क्षमता आणि १०० मेगावॅट ग्रुप कॅप्टिव्ह इंस्टॉलेशन कार्यान्वित केले.

**राज्यातील महत्त्वाचे प्रकल्प:**

- जामखेड येथे २०० मेगावॅट सौर पीव्ही प्रकल्प
- एनटीटी ग्लोबलसाठी १०० मेगावॅट ग्रुप कॅप्टिव्ह सौर प्रकल्प

देशभरात कंपनीने ११.६ गिगावॅट्स नूतनक्षम क्षमतेचा टप्पा पार केला असून ३.५ लाखांहून अधिक रूफटॉप प्रतिष्ठापना पूर्ण केल्या आहेत.

**स्थापित कौशल्य आणि सेवा जाळे**

- सौर मॉड्यूल्सवर ३० वर्षांची वॉरंटी
- ४००+ शहरांत ६५०+ चॅनेल भागीदार व २४०+ अधिकृत सेवा भागीदार
- डिझाइन, EPC, नियामक सुविधा, कमिशनिंग व दीर्घकालीन O&M क्षमता

'महाराष्ट्राचा नूतनक्षम ऊर्जा आराखडा' चर्चासत्र कार्यक्रमात "महाराष्ट्राचा नूतनक्षम ऊर्जा आराखडा" या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्यात: श्री. पीयूष शर्मा (एमएसईटीसीएल श्री. ज्योतिन कुट्टी, सस्तभवन (टाटा मोटर्स), श्री. अनिल कुमार सैनी (पुणे आयटी सिटी मेट्रो रेल), श्री. दिलीपकुमार पाचपांडे (सान्यो स्पेशल स्टील), श्री. विद्याधर वागळे (टाटा पॉवर-पश्चिम), यांनी औद्योगिक डिकार्बोनायझेशन, नियामक तयारी आणि सीअँडआय क्षेत्रातील वेगवान स्वीकार यांवर विचारमंथन केले. 'स्केल सस्टेनेबल' उपक्रमाद्वारे TPREL ने पुणे व महाराष्ट्रातील उद्योगांसोबत भागीदारी मजबूत करत उच्च-परतावा सौर गुंतवणूक, ऊर्जा साठवण आणि दीर्घकालीन खर्च स्पर्धात्मकतेकडे निर्णायक पाऊल टाकले आहे.

# चाकण येथे मराठी भाषा गौरव दिन दिमाखात साजरा

**चाकण (दै. संध्या) :**

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयात मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी भाषा गौरव दिन दिमाखात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रतिमा पुजन संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी केले. मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिंसिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक सविता कुमकर, विभाग प्रमुख सुनिल वडेकर आदी यावेळी उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शनात ३६ प्रयोगांची मांडणी केली होती.

यावेळी विकास गोरे यांनी सांगितले की, " मराठी ही केवळ एक भाषा नाही, तर ती आपली संस्कृती, आपली ओळख आणि आपला अभिमान आहे. संतांची वाणी, शिवरायांची आज्ञा आणि कुसुमाग्रजांची लेखणी ज्या भाषेतून साहित्याचे लेणे लेवून आली, त्या मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. प्रशालेतील शिक्षक विद्यार्थी सदैव मराठी भाषेच्या सन्मानासाठी आणि मराठी माणसाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहतील." प्राचार्या प्रमिला गोरे यांनी स्वागत केले. सुनील वडेकर यांनी सूत्रसंचालन केले. छाया पठारे यांनी आभार मानले.


**महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

## ई - निविदा सूचना

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून **T-113 Recall/2025-26, T-128/2025-26 ते T-140/2025-26** साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर **(https://etender.mahadiscom.in/eatApp)** दि. **02.03.2026 ते 09.03.2026. पर्यंत सकाळी 13.00 वाजे पर्यंत** उपलब्ध आहेत. तसेच निविदा **दि. 09.03.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील. सदर निविदा **दि. 09.03.2026 रोजी 15.30 वाजता** शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी उप. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग पुणे **भ्रमणध्वनी क्र. 7875767829** वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील **"Announcements"** मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता(स्था),**
**स्थापत्य विभाग, पुणे**

PRO No. PRO/PZ/242/2025-26



**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता निरा देवघर प्रकल्प विभाग, यांचे कार्यालय,**

**पत्ताः - निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे, महाराष्ट्र-४१२२०६**

**ई- मेल पत्ता: - niradeoghar@gmail.com, दुरध्वनी क्र. (०२११३) २०२०२०**

**निविदा सूचना क्र- ०५ सन २०२५-२६ प्रसिद्धी**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, कार्यकारी अभियंता, निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (Online) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| (१) | निरा देवघर उजव्या कालव्यावरील थेट विमोचकाचे वाल्व्हमध्ये रुपांतरीत करणेचे काम करणे. | सातारा | रु. ९९.६५ लक्ष |
| (२) | निरा देवघर उजव्या कालव्यावरील कि.मी. ४८ मधील सा. क्र. ४७/४२० मी. येथे जलझुंपी शुंडिका बांधणे. | सातारा | रु. ७६.४० लक्ष |
| (३) | निरा देवघर प्रकल्पांतर्गत, मो. कवठे, ता. खंडाळा, पुनर्वसन गावठाणाच्या पोहोच रस्त्याचे काम करणे | सातारा | रु. ९९.४८ लक्ष |
| (४) | जलसंपत्ती भवन इमारतीचे दुरुस्ती व रंगकामाचे काम करणे | पुणे | रु.४२.९५ लक्ष |

▲ निविदा उपलब्ध कालावधी : दि. ०२/०३/२०२६ ते दि. ०९/०३/२०२६

▲ निविदा उघण्याचा दिनांक : दि. १२/०३/२०२६, दु. १२.०० वा.

जा. क्र. निदेप्रवि/लेशा/निविदा/५२५/सन २०२६
कार्यकारी अभियंता पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग
दि. २४/०२/२०२६
कार्यकारी अभियंता, निरा देवघर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे यांचे कार्यालय.

सही/-
(स्वप्निल वि. कोडुलकर)
कार्यकारी अभियंता
निरा देवघर प्रकल्प विभाग
सांगवी (भाटघर), ता. भोर, जि. पुणे

विमाका/पुणे/जाहि./३४१/२०२५-२६

## थोडक्यात पण महत्वाचे...




### IIEBM–Indus Business School तर्फे मल्टी-स्पोर्ट चॅम्पियनशिपची घोषणा

पिंपरी (दैनिक संध्या) : १९५१ पासून अभिमानास्पद वारसा जपणारी पुणे, पिंपरी चिंचवड मधील नामांकित व्यवस्थापन संस्था IIEBM – Indus Business School यांनी त्यांच्या मेगा इंटर-कॉलेज स्पोर्ट्स चॅम्पियनशिप 'रणभूमी २०२६'ची अधिकृत घोषणा केली आहे. "व्हेअर ग्रिट मीट्स ग्लोरी" या प्रभावी टॅगलाइनखाली आयोजित होणारी ही स्पर्धा विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने "कॉर्पोरेट बॅटलफील्ड रेडी" बनवण्याच्या संस्थेच्या तत्त्वज्ञानाचा विस्तार मानली जाते. ही बहुप्रतिक्षित तीन दिवसीय स्पर्धा १२ ते १४ मार्च २०२६ दरम्यान पुण्यातील चांदखेड आणि वाकड येथे पार पडणार आहे. क्रिकेट, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ आणि ४×१०० मीटर रिले रेस अशा चार रोमांचक क्रीडा प्रकारांमध्ये तीव्र आणि उत्साहवर्धक सामने रंगणार आहेत. १,००० हून अधिक उपस्थिती, ३५ पेक्षा जास्त महाविद्यालयांचा सहभाग, १७ हून अधिक प्रायोजक आणि ३० तासांपेक्षा अधिक अविरत मनोरंजन यामुळे यंदाची रणभूमी ऊर्जा आणि जल्लोषाने भारलेली असेल, अशी अपेक्षा आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी महाविद्यालये छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकलेल्या आणि बांधलेल्या ऐतिहासिक किल्ल्यांचे प्रतिनिधित्व करतील. ₹१,५०,००० पेक्षा अधिक बक्षीस पूल स्पर्धेची प्रतिष्ठा अधिक उंचावतो. १२ आणि १३ मार्च रोजी सामने चांदखेड येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट क्लब येथे होणार असून, १४ मार्च रोजी वाकड येथील IIEBM कॅम्पसवर पुरस्कार वितरण समारंभ आणि हाय-ऑक्टेन डीजे शोडाऊन आयोजित करण्यात आला आहे. विशेष वस्तूंची विक्री आणि मनोरंजन कार्यक्रमांमुळे हा उत्सव क्रीडापलीकडे जाऊन एक भव्य सोहळा ठरणार आहे.



### होळीनिमित्त कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी जादा बसेस

■ वल्लभनगर आगाराचे विशेष नियोजन

पिंपरी (दैनिक संध्या) : होळीच्या सणानिमित्त पिंपरी-चिंचवड परिसरातून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळने विशेष वाहतूक नियोजन केले आहे. वल्लभनगर आगारातून दि. २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी एकूण चार जादा बसेस सोडण्यात येणार असल्याची माहिती आगार प्रशासनाने दिली. या चार जादा बसेसपैकी एक बस चिपळूण मार्गावर तर तीन बसेस खेड मार्गावर धावणार आहेत. तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग, चिपळूण, गुहागर आणि देवगड या प्रमुख कोकण मार्गांवर प्रवाशांच्या मागणीनुसार अतिरिक्त फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. गर्दीच्या पार्श्वभूमीवर बसस्थानकावर अतिरिक्त कर्मचारीही तैनात करण्यात येणार आहेत. दरम्यान, यंदा प्रवाशांनी काउंटरवरील तिकिटांपेक्षा ऑनलाइन आरक्षणाला अधिक पसंती दिली आहे. अनेक बसेसचे आरक्षण आधीच पूर्ण झाले असून, उर्वरित जागांसाठी लवकर आरक्षण करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. होळीच्या सुट्ट्यांमध्ये सुरक्षित आणि सुरळीत प्रवास व्हावा यासाठी आगार व्यवस्थापनाकडून विशेष दक्षता घेतली जात असून, प्रवाशांनी नियोजित वेळेआधी बसस्थानकावर उपस्थित राहावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी मंदिरात फुलांची आकर्षक सजावट



आळंदी (दैनिक संध्या): विजया एकादशीच्या पावन निमित्ताने संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी मंदिराला रंगीबेरंगी आणि आकर्षक फुलांची देखणी सजावट करण्यात आली आहे. देशी-विदेशी विविध प्रकारच्या फुलांनी मंदिर परिसर सुशोभित करण्यात आला असून भाविकांचे लक्ष वेधून घेणारे मनोहारी रूप साकारले आहे. झेंडू, अष्टर, गोंडा, राजा आदी फुलांसह विविध रंगांच्या फुलांचा वापर करून समाधी मंदिरात नयनरम्य सजावट करण्यात आली. माऊलींच्या मुखवट्याला नवीन वस्त्र परिधान करून फुलांची विशेष आरास करण्यात आली असून मुखवट्याचे तेजस्वी आणि प्रसन्न रूप भाविकांना भावत आहे. सकाळपासूनच हे मनोहारी दर्शन घेण्यासाठी भाविकांनी आळंदी नगरीत मोठी गर्दी केली. "ज्ञानोबा माऊली तुकाराम"च्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला होता. विजया एकादशीच्या निमित्ताने मंदिरात धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन आणि अभिषेक यांचेही आयोजन करण्यात आले आहे. या आकर्षक फुलसजावटीमुळे आळंदीतील वातावरण भक्तिमय झाले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# माता रमाई स्मारकाचे भूमिपूजन ११ एप्रिल रोजी होणार : महापौर

## क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्व नियोजनासाठी शहरातील सामाजिक संघटनांची महत्त्वपूर्ण बैठक पार



**माता रमाई स्मारकाचे भूमिपूजन ११ एप्रिल रोजी होणार-महापौर रवि लांडगे**

या बैठकीत शहरात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या त्यागमूरती माता रमाई भीमराव आंबेडकर स्मारकाच्या प्रश्नाकडे भारतरत्न डा.बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी लक्ष वेधले. सामाजिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत स्मारकाच्या उभारणीस तातडीने सुरुवात करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. यासंदर्भात महापौर रवि लांडगे यांनी शहरातील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन माता रमाई आंबेडकर स्मारकाच्या उभारणीसाठी येत्या ११ एप्रिल रोजी भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे या बैठकीत जाहीर केले.

पिंपरी (दै. संध्या) :

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता, सामाजिक समता, शिक्षणाचे महत्त्व आणि संविधानिक मूल्यांची जोपासणे करणे,विचार प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक सलोखा आणि लोकशाही मूल्यांची रुजवणूक होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी व्याख्याने, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने, चित्रफिती, नाट्यप्रयोग तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात येते. या पर्वाच्या नियोजनासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील मधुकर पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील सामाजिक संघटनांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे, डॉ. सुहास कांबळे, नगर सदस्या सारिका मासुळकर,माजी नगरसेवक मारूती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते संतोष जोगदंड, बाळासाहेब रोकडे, अंजना गायकवाड, मंदाकिनी गायकवाड, विशाल ओव्हळ, सिद्धार्थ बनसोडे, विजय जाधव, जितेंद्र मोटे, विनोद सरवदे, दगडू गायकवाड, बापूसाहेब गायकवाड, उत्तम कांबळे, लक्ष्मण माने, धीरज वानखेडे, प्रकाश भुक्तर, अभिजित चव्हाण, माणिक शिंदे, गौतम कांबळे, नदीम शेख, बळीराम काकडे, सचिन गायकवाड, ब्रम्हानंद जाधव, अक्ष भालेराव, कैलाश शिंदे, संतोष शिंदे, रघु बनसोडे, महेंद्र सरवदे, राहुल सोनवणे, युवराज तिकोणे, गणेश भोसले, तुकाराम गायकवाड, कविता पालटवाड यांच्यासह अनेक सामाजिक संघटनाचे सदस्य उपस्थित होते.

या बैठकीत सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगर सदस्य डॉ. सुहास कांबळे यांनी उपस्थित नागरिकांना महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी आम्ही शहरातील नागरिकांच्या सोबत असल्याचे सांगितले.

विचार प्रबोधन पर्व हे केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता सर्वसामान्य नागरिकांपर्यंत विचारांची चळवळ पोहोचवणारे प्रभावी व्यासपीठ कसे बनेल, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीदरम्यान विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी कार्यक्रमांच्या रूपरेषेबाबत सूचना केल्या. स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, अभ्यासक व वक्ते यांना संधी देणे, तसेच महिलांचा व युवकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्याची मागणी करण्यात आली. तसेच विचार प्रबोधन पर्वाच्या आयोजनासाठी संयुक्त नियोजन समिती स्थापन करणे, वेळापत्रक व कार्यक्रमांचे नियोजन वेळेत जाहीर करणे, तसेच प्रसिद्धी-प्रसारासाठी आधुनिक माध्यमांचा वापर करण्याबाबत उपस्थितांनी सूचना मांडल्या.

याशिवाय बैठकीस महापालिकेचे अधिकारी, विविध विभागांचे प्रतिनिधी तसेच शहरातील अनेक नामवंत सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. विचार प्रबोधन पर्वाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## महापालिका सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करा

■ शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांची महापौर, आयुक्तांकडे मागणी ■

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दर महिन्याला होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याची मागणी शिवसेनेचे गटनेते विश्वजीत बारणे यांनी केली आहे. आपला नगरसेवक सभागृहात काय बोलतो, हे जाणून घेण्याचा अधिकार नागरिकांना आहे. त्यामुळे तातडीने या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आग्रही मागणी बारणे यांनी केली आहे. याबाबत विश्वजीत बारणे यांनी महापौर रवी लांडगे आणि महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांची भेट घेतली. त्यांना सविस्तर निवेदन दिले. त्यात गटनेते बारणे यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापनेला आता ४४ वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र, आजही महापालिकेच्या कारभाराबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रमावस्था दिसून येते. महापालिका सभागृहात निवडून आलेले लोकप्रतिनिधी प्रशासनाच्या चुकीच्या कामांना विरोध करून शहराच्या विकासकामांना सातत्याने प्राधान्य देत असतात. नगरसेवक सभागृहात नेमके काय काम करत



आहेत. शहराच्या प्रश्नांवर आपली काय मते मांडत आहेत, हे जाणून घेण्याचा अधिकार नागरिकांना आहे. ज्याप्रमाणे देशामध्ये लोकसभा आणि राज्यांमध्ये विधानसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण केले जाते. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेनेही आपल्या सर्वसाधरण सभेचे थेट प्रक्षेपण सुरू करावे.

जनहिताच्या दृष्टीने अशा प्रकारे सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याचा निर्णय घ्यावा. हा निर्णय घेतल्यास महापालिका सभागृहातील महासभेचे कामकाज थेट प्रक्षेपण करण्याचा निर्णय घेणारी पिंपरी-चिंचवड महापालिका राज्यातील पहिलीच महानगरपालिका ठरेल.

## आता 'फिडेल'च्या सेवा विस्तारसाठी मोठ्या प्रमाणात नवीन संधी

### सुनील कुलकर्णी : फिडेल सॉफ्टटेकने जपानमधील आयएमचा ८३ टक्के हिस्सा संपादित केला

पिंपरी (दै. संध्या) :

'फिडेल सॉफ्टटेक लि.' या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित कंपनीने जपान मधील 'आयएम कॉर्पोरेशन' या तंत्रज्ञान सल्लागार व सॉफ्टवेअर सेवा देणाऱ्या कंपनीत ८३ टक्के हिस्सा संपादित केला आहे. यामुळे पुढील काळात 'फिडेल' च्या सेवा, वितरण क्षमतेला मोठी चालना मिळणार असून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सेवा विस्तार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नवीन संधी उपलब्ध होणार आहेत अशी माहिती 'फिडेल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कुलकर्णी यांनी पुणे येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आयएम कॉर्पोरेशनचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी रेन्या किकुची, फिडेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्राची कुलकर्णी, मंदार इनामदार, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी सुश्रुत पोतदार, आयएमचे विक्री विभाग प्रमुख नागता योशीयाशु, सिस्टीम विभाग प्रमुख ताकाशी सातो, पीसीईटीचे कार्यकारी अधिकारी डॉ. गिरीश देसाई, फिडेलचे व्यवस्थापन सल्लागार अनिल पटवर्धन, डॉ. दीपक शिकारपूर, आयएमएचे ग्लोबल बोर्ड माजी अध्यक्ष सुनील देशमुख आदी उपस्थित होते.



पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असणारा एक मराठी उद्योजक जपान मध्ये जाऊन आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण करतो आणि अल्पावधीतच आयएम सारख्या कंपनीचा मोठा हिस्सा संपादित करतो ही बाब सर्व भारतीय उद्योजकांना तसेच स्टार्टअप सुरू करणारे उद्योजकांना प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. आयएम कॉर्पोरेशन आणि त्यांच्या परंपरागत ग्राहकांनी फिडेल सॉफ्टटेक वर दाखवलेला विश्वास सुनील कुलकर्णी आणि त्यांचे टीम सार्थ ठरवेल. अनिल पटवर्धन म्हणाले की, फिडेल सॉफ्टटेक जून २०२२ मध्ये सूचीबद्ध झाली आहे. तेव्हापासून सातत्याने महसूल वाढ नोंदवली आहे.

डॉ. दीपक शिकारपूर यांनी सांगितले की, या कंपनीचा विकास मार्ग तिच्या भागधारकांसाठी मजबूत मूल्य निर्माण करेल आणि गुंतवणूकदारांना उत्साहवर्धक करता येईल असा विश्वास आहे. सुनील देशमुख म्हणाले की, आयएम आणि फिडेल एकत्रितपणे नवीन कौशल्यासह ग्राहकांना उत्तम सेवा देऊन आणि भागधारकांना वाढीच्या संधी उपलब्ध करून देतील.

सुनील कुलकर्णी यांनी सांगितले की, फिडेल सॉफ्टटेक ही तीन दशकांहून अधिक अनुभव असलेल्या जपान येथील मराठी उद्योजकाची कंपनी आहे. जपान आणि भारत यामध्ये उच्च दर्जाचे तंत्रज्ञान, बायलिंग्वल कन्सल्टिंग आणि भाषा अभियांत्रिकी क्षेत्रात २५ वर्षांपासून कार्यरत आहेत. या भागीदारीमुळे जपानी उद्योगांच्या गरजांनुसार तयार केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेवा, उद्योग उपाययोजना अंमलबजावणी, द्विभाषिक सल्ला, व्यवस्थापित सेवा आणि भाषा स्थानिकीकरण या क्षेत्रांमध्ये 'फिडेल'च्या क्षमतेमध्ये मोठी वाढ होईल. स्थानिक प्रकल्प व्यवस्थापन कौशल्य आणि जागतिक तंत्रज्ञान क्षमते द्वारे नावीन्यपूर्ण परिणाम देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

आयएम कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आणि सीइओ रेन्या किकुची यांनी सांगितले की, सुनील कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली आता फिडेल सॉफ्टटेक आणि आयएम कॉर्पोरेशनच्या सेवा आणखी उच्च दर्जाने देता येईल. गेल्या तीन वर्षात आयएम ने डिलिव्हरी उत्पादकता आणि ज्ञान पुनर्वापर सुधारण्यासाठी त्यांच्या मालकीच्या न्युरल नॉलेज फ्रेमवर्कचा वापर करून मॉडेल्स विकसित केले आहेत. १५० पेक्षा अधिक कुशल व्यवसायिकांच्या टीमसह उच्च गुणवत्ता आणि तंत्रज्ञान सेवा देण्यासाठी आम्ही एकत्रितपणे सज्ज झालो आहोत.

## मोशी कचरा डेपोतील रासायनिक सांडपाणी थेट इंद्रायणी नदीत; जनावरांचे मृत्यू, नागरिकांच्या आरोग्यावर संकट

**शेती, विहिरी आणि पवित्र इंद्रायणी प्रदूषित; प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची नागरिकांची मागणी**

मोशी (दै. संध्या) :

मोशी कचरा डेपोतून येणाऱ्या रसायनमिश्रित आणि दूषित सांडपाण्यामुळे परिसरातील शेती, विहिरी आणि पवित्र इंद्रायणी नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, महापौर रवी लांडगे आणि मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांना लेखी निवेदन दिले आहे.



मोशी येथील बोराटे वस्ती परिसरात असलेल्या कचरा डेपोतून मोठ्या प्रमाणावर दूषित पाणी खालच्या बाजूला असलेल्या ओढ्या-नाल्यांच्या प्रवाहात मिसळत आहे. हे विषारी पाणी परिसरातील शेतजमिनी आणि विहिरींमध्ये उतरत असल्याने शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, दूषित पाणी प्यायल्यामुळे गाई, म्हशी आणि शेळ्या मृत्युमुखी पडत आहेत. शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. हेच पाणी पुढे जाऊन मोशी येथे इंद्रायणी नदीला मिळत असल्याने नदीचे पावित्र्य नष्ट होत असून, वारकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नदीच्या प्रदूषित पाण्यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीविताला आणि आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या विषयाचा पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली. कचरा डेपोतून येणारे हे सांडपाणी बंद पाईपलाईनद्वारे योग्य ठिकाणी सोडावे, जेणेकरून प्रदूषण थांबेल, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

> कचरा डेपोतील रसायनमिश्रित पाण्यामुळे जलस्रोत प्रदूषित झाले आहेत. जनावरे दगावत आहेत. हेच पाणी इंद्रायणी नदीत मिसळून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. आम्ही अनेकदा तक्रारी केल्या आहेत, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. प्रशासनाने आता तरी गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांचे आरोग्य आणि पवित्र नदीचे रक्षण करावे, अन्यथा तीव आंदोलन छेडावे लागेल.
> **- संतोष बोराटे, नागरिक**

# तळेगाव फ्लोरिकल्चर पार्कमधील शेतकरी संकटात

**अनुदान बंद, वीज तोडणीमुळे फुलउत्पादन धोक्यात**

> जानेवारी 2026 पासून फ्लोरिकल्चर ग्राहकांसाठी 309 हा नवीन टेरिफ आणण्यात आला आहे. तसेच मार्च 23 ते डिसेंबर 25 पर्यंतचे अनुदान रक्कम चालू बिलात वर्ग करण्यात आली आहे. वीजबिल थकबाकी वसुलीसाठी वारंवार आवाहन करूनदेखील प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार खंडित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. **- जयप्रकाश सागरे, उपकार्यकारी अभियंता, वीज महावितरण, तळेगाव**

तळेगाव स्टेशन (दै. संध्या) :

तळेगाव येथील फ्लोरिकल्चर पार्क एमआयडीसी येथील शेतकऱ्यांचे मार्च 23 पासून शासकीय अनुदान मिळणे बंद झाल्यामुळे येथील फूल उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत. वीजप्रश्न, अनुदान रद्द, ग्राहकवर्ग बदल यामुळे फूलउत्पादक शेतकरी अर्थिकदृष्ट्या अडचणीत आला आहे. फ्लोरिकल्चर पार्क, असोसिएशन, एमआयडीसी तळेगाव येथील सर्व प्लॉटधारक व फूल उत्पादक शेतकरी यांच्या वतीने बुधवारी (दि. 25) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बळीराजा अनुदान योजना अचानक बंद करणे, ग्राहक वर्ग बदलणे, मागील 2 ते 3 वर्षांची बिले एक रकमी आकारणे, थकबाकीच्या कारणास्तव वीज तोडणीची कारवाई याबाबत मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधींना निवेदने देण्यात आलेली आहेत.

परंतु अद्याप ठोस निर्णय झाला नसल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. पत्रकार परिषदेस असोसिएशनचे सचिव मल्हार ढोले, मयूर भोसले, अद्वैत भट, शुभाग बोरी आणि फूलउत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासकीय अनुदान रद्द झाल्यामुळे जादा रकमेची बिले तसेच एक रकमी वीजबिले आल्यामुळे वीजबिले भरणे आर्थिकदृष्ट्या अडचणीचे होत असल्यामुळे वीज महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत निर्णय लागेपर्यंत वीजपुरवठा खंडित करु नये याबाबत विनंती केलेली आहे. तरी वीजपुरवठा तोडणेबाबत कार्यवाही सुरू झालेली आहे. यामुळे फुलझाडांना पाणीपुरवठा करण्यात येत नसल्यामुळे फुलउत्पादन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तरी शासनाने यात लक्ष घालावे आणि आमच्यावरील अन्याय दूर करावा असे मल्हार ढोले यांनी सांगितले.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### कारगिल युद्धातील वीरांचा जेजुरी देवसंस्थानच्यावतीने सन्मान

जेजुरी (दैनिक संध्या) : कारगिल युद्धात पराक्रम गाजविणारे भारतीय सैन्य दलातील वीर ब्रिगेडियर सुनील बोधे. कर्नल सुभाष पोळ ,कर्नल सुभाष सावंत, कर्नल अरुण शिंदे,भाग्यवान म्हस्के यांनी जेजुरी गडावर कुलदैवत श्री खंडेरायाचे दर्शन घेतले. यावेळी देवसंस्थांचे अध्यक्ष मंगेश घोणे, विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी या वीरांचा सन्मान केला.



### आळंदीत 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा' कार्यशाळेला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आळंदी (दैनिक संध्या) : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली 'राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण' या उपक्रमांतर्गत राज्यातील प्रेरणादायी कीर्तनकार व वक्त्यांची कार्यशाळा आळंदी येथे आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आत्मसंरक्षणाबरोबरच चारित्र्यनिर्मितीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला वारकरी संप्रदायाकडून उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. कार्यशाळेत उपस्थित वारकऱ्यांनी शालेय शिक्षण विभागाच्या या उपक्रमास पुढे नेण्यासाठी जबाबदारी स्वीकारत असल्याचे जाहीर केले. अखिल वारकरी गुरुकुल संघ तसेच राज्यातील विविध वारकरी शिक्षण संस्थांचे अध्यापक आणि कीर्तनकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'संस्कार आणि सुरक्षा' यांची सांगड घालत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमात 'राष्ट्रनिर्मितीची संस्कारमूल्ये' या अभ्यासक्रम पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रकाशनानंतर उपस्थितांना पुस्तिकेच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. विविध वारकरी शिक्षण संस्थांच्या प्रमुखांनी संत साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश, अध्यापनातील पद्धतशीरता, विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जडणघडण आणि आत्मसंरक्षणासोबत चारित्र्य संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे संयोजन वारकरी संप्रदाय युवा मंचचे अध्यक्ष अक्षय भोसले यांनी केले. सूत्रसंचालन उमेश बागडे यांनी तर आभार प्रदर्शन किशोर धुमाळ यांनी केले. वारकरी परंपरेतील मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थ्यांना सशक्त व संस्कारक्षम घडविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### पाचवीतील मुलीच्या छेडछाड प्रकरणी सविंदणे हायस्कुल मधील शिक्षकावर गुन्हा

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील सविंदणे येथील श्री गुरुदेव दत्त विद्यालयातील विद्यार्थ्यांची सहल सातारा जिल्ह्यातील पाचगणी,महाबळेश्वर परिसरात गेलेली असताना इच्छा नसताना देखील इयत्ता पाचवीतील एका अकरा वर्षीय बालिकेस जबरदस्तीने हॉर्स रायडिंग करण्यासाठी भाग पाडलेल्या व मुलीच्या मनास लज्जा निर्माण होईल अशा पद्धतीने मुलीची छेडछाड करणाऱ्या विद्यालयातील शिक्षक आरोपी नितीन अशोक चव्हाण यांच्या विरोधात बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२ व ८ व भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४ नुसार शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईने शिरूर पोलिसांत रीतसर तक्रार/फिर्याद दाखल केली असून गुन्हा पाचगणी जि.सातारा पोलिसांकडे कालच वर्ग करण्यात आल्याची माहिती शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली. दरम्यान सविंदणे येथील याच शिक्षकास टोळक्याने भर चौकात बेदम मारहाण केल्या प्रकरणी निषेध म्हणून सविंदणे गाव बंद ठेवण्यात आले होते.शालेय विद्यार्थ्यांनी शिक्षकास झालेल्या मारहाणीच्या घटनेचा निषेध व्यक्त करीत सरांना न्याय मिळालाच पाहिजे,आरोपींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे अशा जोरदार घोषणा दिल्या होत्या. घटनेचे गांभीर्य पाहून शिरूर पोलिसांनी सविंदणे येथे मोठा बंदोबस्त ठेवला होता.सुमारे चार तास चाललेल्या आंदोलकांना सखोल चौकशी करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. दरम्यान सविंदणे येथील चव्हाण या शिक्षकाला झालेल्या मारहाण प्रकरणी १२ जणांविरोधात शिरूर पोलिसांत रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला असून घटनेचा पुढील तपास शिरूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार हे करीत आहेत.

# पुरंदर विद्यासंकुलात मराठी गौरव दिनानिमित्त वृक्ष माझा सखा उपक्रम संपन्न




पुरंदर (दै. संध्या)

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पुरंदर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज सासवड येथे दिनांक 27 फेब्रुवारी रोजी विद्या संकुलाचे प्राचार्य श्री इस्माईल सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचे ज्येष्ठ लेखक व ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कुसुमाग्रज ( वि वा शिरवाडकर ) यांच्या जन्मदिनानिमित्त जागतीक मराठी भाषादिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रसिद्ध लेखक व कवींची ओळख व्हावी म्हणून पर्यावरणशी संबंधित वृक्ष माझा सखा हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात विद्या संकुलातील १48 झाडांना प्रसिद्ध लेखक व कवी यांची नावे देण्यात आली, हे कार्य गटाने केले गेले. त्यामुळे त्या झाडाची देखभाल करण्याची जबाबदारी त्या ग्रुपवर देण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मराठी वाङमयाची ओळख व्हावी म्हणून मराठी वाङमयाची मंडळाची स्थापना करण्यात आली. राजभाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य श्री इस्माईल सय्यद यांनी भारत सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे मराठी भाषेला चांगले दिवस येतील व इंग्लिश मीडियमला सुद्धा प्रथम भाषा म्हणून मराठी शिकवावं लागेल असा निर्णय होऊ शकतो असे मार्गदर्शन केले व मराठी भाषा निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुण्या सामाजिक वनीकरण परिक्षेत्र सासवड च्या वन परिक्षेत्र अधिकारी श्रीमती यशश्री भालेराव यांनी मराठी भाषा इतर भाषेपेक्षा वेगळी कशी आहे ते सांगितले.व विद्यार्थ्यांना Mpsc , UPSC व स्पर्धा परिक्षेविषयी मार्गदर्शन केले.

त्यांच्या सोबत वनपाल श्री हेमंत मोरे,माधुरी जगताप,वनरक्षक रेश्मा गायकवाड ह्यांनी हरित सेने विषयी मार्गदर्शन केले... श्रुतिका विभाड व शर्वरी टेकवडे या विद्यार्थ्यांनी मराठीची थोरवी आपल्या भाषणातून व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य श्री इस्माईल सय्यद होते, प्रा राजेंद्र निचळ,पर्यवेक्षक विजय खोमणे,राजाभाऊ कदम,रविन जगदाळे, संजय पाटीलतसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

वृक्ष माझा सखा ह्या उपक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख प्रा बालाजी परतवाड यांनी केले.यामध्ये अकरावी वर्गातील विद्यार्थी सहभागी होते. त्यात ओम होले, तुषार चव्हाण, प्रज्वल खोमणे,ओम कुंभरकर,दामिनी पवार,साक्षी पवार,ज्ञानेश्वरी खेसे,अक्षरा खेडेकर,अनुष्का मगर,स्नेहल नवले,प्रियांका भोसले,योगिता कामठे,आर्या गायकवाड,या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मराठी दिनाच्या कार्यक्रमाचे सूत्र संचलन प्रा श्री भानुदास कटके तर आभार प्रदर्शन प्रा कैलास गवळी यांनी केले.

## मेघ मल्हार संगीत विद्यालयाचा वर्धापन दिन व गुणगौरव सोहळा

जेजुरी (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील मेघ मल्हार संगीत विद्यालयाचा १३ वा वर्धापन दिन व अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ दिनांक १ मार्च रोजी आयोजित करण्यात आला असल्याचे संचालक अमोल बेलसरे यांनी सांगितले. सासवड येथील कऱ्हाबाई भवनात होणाऱ्या या सोहळ्यास सुप्रसिद्ध तबलावादक व रचनाकार पंडित उमेश मोघे तसेच ज्योतिषाचार्य सिद्धेश्वर मारटकर उपस्थित राहणार आहेत. गेल्या तेरा वर्षांपासून संगीत क्षेत्रात सातत्याने १००% निकालाची परंपरा जपणाऱ्या विद्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या कलेचा गौरव करण्यात येणार असून, याच कार्यक्रमात



पुरंदर तालुक्यातील कलाक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. दैनिक पुढारीचे प्रतिनिधी नितीन राऊत, जयमल्हार ब्रॉस बँडचे राजेंद्र मोरे, लोक कलावंत दशरथ लाखे,कलावंतांसाठी सेवा कार्य करणाऱ्या निलम खंडागळे तसेच दत्तात्रय (तात्या) फडतरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.अशी माहिती मेघ मल्हार संगीत विद्यालय पुरंदरचे प्रमुख अमोल बेलसरे यांनी सांगितले.

## हरणी विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

नाझरे सुपे (दै. संध्या)



हरणी माध्यमिक विद्यालय हरणी येथे आज राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय सासवड यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

या शिबिरासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. अशोक गिरी उपस्थित होते. तसेच डॉ. कीर्ती गोसावी, फार्मासिस्ट महादेवी राऊत मॅडम व परिचारिका सौ. सीमा खैरे यांनी विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी केली. विद्यार्थ्यांची उंची, वजन, दृष्टी, दात व सर्वसाधारण शारीरिक तपासणी करण्यात आली. आवश्यक तेथे पुढील उपचार व मार्गदर्शनाबाबत सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व, संतुलित आहार व नियमित व्यायाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. पिसाळ सतीश तुकाराम यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून विद्यालयाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

सदर प्रसंगी विद्यालयाचे उपशिक्षक मा. श्री. जगताप आर. व्ही. तसेच मा श्री. पठारे बी. एम. मा. श्री.जामदार जी. बी.तसेच उपशिक्षिका सौ. नाकाडे ए. आर. मॅडम तसेच सौ. कदम एस. टी. मॅडम उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी श्री.जगताप विजय व श्री.जगताप श्रीकांत यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी मा. श्री. जगताप डी. के. यांनी उपस्थितांचे आभार मानले. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून, गरजू विद्यार्थ्यांना पुढील वैद्यकीय सल्ल्यासाठी मार्गदर्शन देण्यात आले. विद्यालय प्रशासन, शिक्षकवर्ग व पालकांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

## मराठी भाषा गौरव दिन वीर बाजी पासलकर विद्यालय, सासवड येथे संपन्न

सासवड (दै. संध्या)




महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखा व सासवड नगरपालिका शिक्षण मंडळ संचलित वीर बाजी पासलकर विद्यालय शाळा क्रमांक एक येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांचे शाळेच्या वतीने श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त महान साहित्यिक कुसुमाग्रज उर्फ तात्यासाहेब शिरवाडकर हे मराठी भाषेला पडलेले स्वप्न होते. करेल जो मनोरंजन मुलांचे,जडेल नाते प्रभूशी तयाचे. या उक्तीनुसार कविवर्य अनिल कदम यांनी मुलांना मनोरंजन पर गोष्टी सांगून स्वलिखित 'समेवर येताना ' या काव्यसंग्रहातील कविता गेय गाऊन दाखविल्या व पुस्तक शाळेला भेट दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक केशव काकडे यांनी केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब मुळीक, कार्याध्यक्ष सतीश पाटील, प्रमुख पाहुणे केशव काकडे, ज्येष्ठ साहित्यिक सुरेश कोडीतकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम मुळीक यांनी मराठी भाषेला जागतिक अभिजात भाषेचा दर्जा मिळलेला असताना मराठी भाषेचे महत्व कशा प्रकारे वृद्धिंगत होईल या विषयाची सखोल माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.याबरोबरच मराठी साहित्य परिषद सासवड शाखेचे कार्याध्यक्ष सतीश पाटील यांनी कुसुमाग्रजांची नावाजलेले नटसम्राट विशाखा हे पुस्तक मुख्याध्यापिका माधुरी मुळीक यांना शाळेसाठी भेट दिले . विशेष म्हणजे या विद्यालयात बरेचसे विद्यार्थी द्विभाषिक असून सुद्धा त्यांनी मराठीत सुंदर पद्धतीने भाषण केले हे वैशिष्ट्य ठरले. यावेळी मुलांची प्रभात फेरी, ग्रंथदिंडी काढून मराठी भाषेचा जागर करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे, कवितांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते हे प्रशंसनीय होते. यावेळी वर्षा खळदकर, वासंती बडदे, मीना कांबळे, संगीता हराळे, विजयश्री घोगरे पालक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापिका माधुरी मुळीक व सूत्रसंचालन संजीव कांबळे यांनी केले.

## मासूमच्यावतीने जेजुरीत महिला आरोग्य संवाद कार्यक्रम

जेजुरी (दै. संध्या)

महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ मासुमच्या वतीने जेजुरी येथील मल्हार नाट्यगृहात महिलांसाठी आरोग्य संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे मासूमच्या सह सयोंजक मीना शेंडकर यांनी सांगितले. महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ मासूम ही संस्था १९८७ मध्ये पुरंदर तालुक्यात सुरू झाली . डॉक्टर रमेश अवस्थी आणि डॉक्टर मनीषा गुप्ते हे संस्थेचे संस्थापक विश्वस्त आहेत. स्त्रिया मुले दलित आणि वंचित गटातील लोकांसाठी संस्था हक्काधारीत आणि स्त्रीवादी दृष्टिकोनातून काम करत आहे. संस्थेचे काम पुणे जिल्ह्यातील पुरंदर भोर नसरापूर वेल्हा बारामती पारनेर तसेच औरंगाबाद मध्ये पैठण आणि गंगापूर या तालुक्यांमध्ये ही संस्थेचे काम सुरू आहे. स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करणे. स्त्रियांची कुटुंबातील आणि समाजातील पत वाढवणे स्त्रियांच्या हाती संसाधनाची मालकी आणणे. त्यांची निर्णय क्षमता वाढवणे तसेच संपत्तीतही स्त्रियांचा हक्क प्रस्थापित करणे. यासाठी बचत गटातील महिलांचे सबलीकरण करणे. तसेच व्यवसाय मार्गदर्शन आणि मासूमने घर दोघांचे आणि शेत दोघांचे हे अभियान राबवले आहे. घरावर आणि शेतीच्या सातबारा मध्ये सह हिस्सेदार म्हणून महिलांची नावे लावण्याचे काम मासूम करत आहे. तसेच महिलांनी आपल्या प्रजनन व लैंगिक आजारांबद्दल मोकळेपणाने बोलणे व त्याची काळजी घेणे यासाठी जनजागृती आणि आरोग्य तपासणी मिळावे. अंगावरून लाल जाणे अंगावरून पांढरे जाणे तसेच अंग बाहेर येणे अशा आजारांवर वेळेत उपचार करून घेणे यासाठी महिला बरोबर संवाद साधणे.



## जेजुरी जिजामाता विद्यालयात मराठी भाषा दिन साजरा

### मराठी माणसाचा आत्मा म्हणजे मराठी भाषा : प्राचार्य नंदकुमार सागर

जेजुरी (दै. संध्या)

फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा दिन म्हणून जेजुरी येथील जिजामाता विद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांना यावेळी अभिवादन करण्यात आले. मराठी साहित्याला जागतिक ओळख मिळवून देणारे थोर कवी, साहित्यिक व विचारवंत विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त जेजुरी जिजामाता विद्यालयात मराठी भाषदिन दिवस साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना महाराष्ट्र

**■ ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांना अभिवादन**

राज्य माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर यांनी कुसुमाग्रज यांनी आपल्या साहित्यिक लेखनातून मराठी भाषेला वैचारिक बळ, सामाजिक जाणिवा व मानवी मूल्यांची उंची दिली. काव्य, नाटक, कथा आणि निबंध या सर्व साहित्यप्रकारांत त्यांनी भरीव योगदान दिले. "मराठी माणसाचा आत्मा म्हणजे मराठी भाषा" हा विचार त्यांच्या लेखनातून सातत्याने प्रकट होताना दिसतो असे सांगितले. कुसुमाग्रज यांचे साहित्य आजही नव्या पिढीला प्रेरणा देत असून मराठी भाषेचा गौरव वाढविण्यात त्यांचे योगदान अमूल्य आहे.मराठी भाषा जतन करण्यासाठी आपण कटिबध्द राहू असे प्राचार्य सागर यांनी सांगितले. या कार्यक्रम प्रसंगी केंद्र प्रमुख सुरेखा कामथे, मुख्याध्यापक अशोक चव्हाण, जेजुरी देवसंस्थानचे माजी विश्वस्त नितीन राऊत, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, पोपट राणे, निर्मला निगडे, राजेंद्र ताम्हाणे,कुलदीप साळवी, जितेंद्र कोकणे, अजय जगताप आदी उपस्थित होते.

## धावत्या चारचाकीला भीषण आग

पाटस (दै. संध्या) : पाटस (ता. दौंड) परिसरातील दौंड - पाटस अष्टविनायक महामार्गावर शुक्रवारी (दि. २७) सकाळी पावणे अकराच्या सुमारास चारचाकी वाहनाला अचानक आग लागून वाहन पूर्णपणे जळून खाक झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांच्या मिळालेल्या माहितीनुसार, चालक पाटसवरून दौंडकडे जात होता. गार फाटा परिसरात चारचाकी वाहनातून अचानक धूर निघू लागला. चालकाने तत्काळ वाहन रस्त्याच्या कडेला थांबवले. काही क्षणातच इंजिन भागातून मोठ्या प्रमाणात आगीच्या ज्वाळा उसळल्या आणि वाहनाने भयंकर पेट घेतला. आग लागल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी व तरुणांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. काहींनी पाण्याच्या बादल्या आणून आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी वाहतूक बाजूला वळवून पुढील अपघात टाळण्याचे काम केले; मात्र आग प्रचंड असल्याने काही मिनिटांतच संपूर्ण वाहन ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी पडले.

### प्रभात फेरी, कविता व कथा वाचन, कुसुमाग्रजांच्या विविध आठवणी सांगत

# सासवडला मराठी भाषा गौरव दिन साजरा

सासवड (दै. संध्या)



कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणुन साजरा करण्यात आला सासवड येथे महाराष्ट्र साहित्य परिषद सासवड शाखा व सासवड नगरपालिकेच्या सर्व शाळांमधून विविध उपक्रम राबवीत मराठी भाषेच्या संवर्धन व विकासावर भर देण्यात आला. पालिकेच्या इंदिरा गांधी विद्यालय येथे सेवानिवृत्त शिक्षिका स्नेहल देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, प्रतिज्ञा संविधान वाचन, समीर सामंत यांची हीच आमची प्रार्थना न हेच आमुचे मागणे ही प्रार्थना व मराठी भाषेच्या सन्मानार्थ श्री संत सोपानदेव महाराज यांच्या प्रांगणात काढलेली प्रभात फेरी, कार्यक्रमादरम्यान माझी भाषा माझी आई.. अर्थ भावनांना देई हे सामुहिक गीत यामुळे कार्यक्रमाची उंची वाढली. आज आमलकी एकादशी असल्याने प्रभातफेरीला देखीलअध्यात्माची वेगळी जोड मिळाली. अध्यक्षीय भाषणात स्नेहल देशपांडे यांनी कुसुमाग्रज यांच्या बालपणापासून ते त्यांनी स्थापन केलेले ध्रुव मंडळ त्यांचा साहित्याचा व्यासंग, त्यांच्या नटसम्राट, विशाखा, जीवन लहरी या साहित्य प्रवासाचा आढावा घेतला. कविता, गोष्ट, गाणे सादर करत देशपांडे यांनी मुलांशी संवाद साधला. मराठी भाषा वाढवण्यासाठी वाचन वाढवा असे आवाहनही त्यांनी केले. साहित्य परिषदेच्या वतीने हेमंत ताकवले यांनी प्रास्तविक करत परिषदेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शर्वरी कोकरे, पूर्वा गरुड, अन्वी जाधव या विद्यार्थ्यांची मनोगते टाळ्या मिळवून गेली विद्यालयाच्या मुखाध्यापिका अनुराधा राम दहिवाळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर शिवाजी राजीवडे यांनी सूत्रसंचालन केले.

माजी नगराध्यक्षा कलाताई फडतरे, राष्ट्रपती पदक विजेते कुंडलिक मेमाणे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मनोहर कामठे, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, साहित्य परिषद कार्याध्यक्ष सतीश पाटील, शहर पत्रकार संघाचे भाऊ गुरव, बाळासाहेब कुलकर्णी, जीवन कड, जगदीश शिंदे यांसह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते दत्तात्रय खेडेकर, नारायण चौधरी, वर्षाराणी शिर्के, स्वाती देवकर, नीलम जाधव व शिवाजी राजीवडे यांनी या सुंदर कार्यक्रमाचे देखणे आयोजन केले.

सासवड येथील संत नामदेव, वीर बाजी पासलकर आदी शाळांतून देखील हा कार्यक्रम साजरा करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष सतीश पाटील यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 'उमंग टुडेज वुमन'कडून नारी शक्तीला सलाम; हळदीकुंकू समारंभात महिलांचा सन्मान

मुंबई (दैनिक संध्या) : स्त्रीशक्तीचा गौरव आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्याच्या उद्देशाने 'उमंग टुडेज वुमन' या महिला गटातर्फे १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्रभादेवी येथील श्री सिद्धीविनायक मंदिर परिसरातील व्रतमेजवानी येथे हा उत्सव उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिलांनी पारंपरिक पोशाखात हजेरी लावत उत्सवाची शोभा वाढवली. महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. लाईव्ह रांगोळी स्पर्धा, उखाणा स्पर्धा, थाळी सजावट स्पर्धा तसेच नऊवारी महाराष्ट्रीयन लूक स्पर्धा यांना विशेष प्रतिसाद मिळाला. विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू आणि बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. हा उत्सव सर्व महिलांसाठी विनामूल्य आयोजित करण्यात आला होता. उपस्थित प्रत्येक महिलेला सन्मानपूर्वक भेटवस्तू देत स्त्रीत्व, संस्कृती आणि एकतेचा संदेश देण्यात आला. 'उमंग टुडेज वुमन' हा गट विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांद्वारे महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असतो. यावेळीही हळदीकुंकू समारंभाच्या माध्यमातून महिलांचा सन्मान करत स्त्रीशक्तीला सलाम करण्यात आला. कार्यक्रम थाटामाटात आणि आनंदोत्सवात संपन्न झाला.




### 'सेवाधाम'ला डिलाईट फार्मसीचे मोफत आरोग्य शिबिर

शिरूर (दैनिक संध्या) : पिंपळे जगताप येथील सेवाधाम या मतिमंद मुलांच्या महाविद्यालयास डिलाईट कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन तेथील मुलांची मोफत आरोग्य तपासणी केली व मुलांना दैनंदिन लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचे व खाऊचे वाटप केले. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सार्वजनिक उपक्रमाचे सेवाधाम चे संचालक डॉ.पवन कट्यारमल यांनी कौतुक केले, गेली सहा ते सात वर्ष सातत्याने डिलाईट कॉलेज ऑफ फार्मसीचे विद्यार्थी या ठिकाणी भेट देतात व मुलांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना दैनंदिन लागणारे आवश्यक वस्तू तसेच खाऊचे वाटप करतात, मतिमंद मुलांबरोबर वेळ घालवून फार्मसीची मुलं त्यांना आनंद देतात, यावर्षी न्यू लाईफ आयुर्वेद हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते, डॉ.विलास गिरी व परिचारिका कल्पना घायतडक यांनी मुलांची तपासणी केली. या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक अल-अमीन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. नासिर शेख, सहसचिव श्री.जाहीद शेख संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. अमीर इनामदार व प्राचार्य डॉ.संपत नवले यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. अनिल पांचाळ व प्रा. प्रतीक्षा गोरे यांनी केले.

### राष्ट्रीय पाली गौरव पुरस्कारासाठी नामांकन पाठवण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : पाली भाषेला २०२४ मध्ये अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर तिच्या संवर्धन आणि प्रसारासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पद्मपाणी फाउंडेशन प्रणित अभिजात पाली भाषा संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने "राष्ट्रीय पाली गौरव पुरस्कार २०२६" जाहीर करण्यात आला असून त्यासाठी देशभरातून नामांकन मागविण्यात येत आहे. पाली भाषा, बौद्ध अध्ययन आणि संबंधित संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राध्यापक, संशोधक, साहित्यिक आणि कार्यकर्त्यांचा सन्मान या पुरस्काराद्वारे करण्यात येणार आहे. हा पुरस्कार रविवार, २२ मार्च २०२६ रोजी पुणे येथे आयोजित अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन मध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. या संमेलनास देशभरातील पाली व बौद्ध अध्ययन क्षेत्रातील विद्वान, प्राध्यापक, संशोधक तसेच अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील पाली तज्ज्ञ, ज्येष्ठ विचारवंत आणि विविध विद्यापीठांतील मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. देशातील विविध महाविद्यालये व विद्यापीठांमधील पाली भाषा विभाग किंवा बौद्ध अध्ययन विभागातील प्राध्यापक, विभागप्रमुख, संशोधक तसेच पाली साहित्य निर्मिती, ग्रंथ संपादन, अनुवाद, अभ्यासक्रम विकास किंवा पाली भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती या पुरस्कारासाठी पात्र राहतील. या पुरस्कारासाठी स्वयं-नामांकन (Self-Nomination) करता येईल तसेच पाली विभागप्रमुख किंवा सहकाऱ्यांकडूनही नामांकन सादर करता येणार आहे. नामांकन फॉर्म पूर्ण भरून त्यासोबत आवश्यक कागदपत्रे — जसे की सविस्तर परिचयपत्र (CV), प्रकाशित पुस्तके किंवा संशोधन निबंध, कार्याचा पुरावा इत्यादी जोडणे आवश्यक आहे. नामांकन सादर करण्याची अंतिम तारीख १५ मार्च २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. नामांकन फॉर्म आणि अधिक माहितीसाठी इच्छुकांनी rahuldambale@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा किंवा ९८२२०९८८७० या अधिकृत क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुण्यात मुळा-मुठा नदीपात्रातील कचऱ्याला भीषण आग; अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न

पुणे (दैनिक संध्या) : लोणी काळभोर येथील मुळा-मुठा नदीच्या पात्रात अवैधरित्या टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागली. यामुळे परिसरात प्रचंड धुराचे लोट पसरले असून नागरिकांना श्वसनाचा त्रास होत आहे.आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न शुक्रवारी उशिरापर्यंत सुरू होते. स्वच्छ भारत मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात स्वच्छता आणि नदी संवर्धनासाठी प्रयत्न सुरू असताना, लोणी काळभोर येथे मात्र नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर कचरा टाकून तो जाळण्याचा प्रकार अनेकदा उघडकीस आल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या पुणे शहराला लागून असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती आहेत. तसेच सदर ग्रामपंचायती पुणे शहरालगत व पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे या भागामध्ये नागरीकरण वाढते आहे. सदर महामार्गावरील या ग्रामपंचायतींच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर हॉटेल इंडस्ट्री, मंगल कार्यालये इत्यादी आहेत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींच्या हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा उत्पन्न होतो. परंतु कचरा संकलनासाठी जागा आणि कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प आजमितीस उपलब्ध नाही.

# आरोग्य सेवा मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क : डॉ. रमेश अवस्थी

**जेजुरी (दै. संध्या)**




संविधानातील कलम २१ मधील सन्मानाने जगण्याच्या हक्कानुसार आरोग्य सेवा मिळणे हा प्रत्येकाचा हक्क आहे व ती चांगली मिळवण्यासाठी आपण सजग असावे असे मासूम संस्थेचे संस्थापक विश्वस्त डॉ रमेश अवस्थी यांनी सांगितले.

महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ, मासूम संस्थेच्या वतीने जेजुरी येथे आरोग्य संवाद हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पुरंदर तालुक्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील आरोग्य सेवांचा मासूमच्या वतीने अभ्यास करण्यात आला, याची माहिती सोनाली सुतार यांनी दिली. पुरंदर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये सामान्य नागरिकांना येणाऱ्या अडचणी, त्याचसोबत आरोग्य सुविधांच्या कमतरता अशा विविध प्रश्नांवर महिला व पुरुष तसेच युवांनी तालुका आरोग्य अधिकारी तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य यांच्यासमोर प्रश्न उपस्थित केले. त्याचबरोबर यांपैकी काही प्रश्नांवर तीन महिन्यांमध्ये काम व्हावे असे आवाहन देखील करण्यात आले. परिंचे आरोग्य केंद्र संकेत जाधव, बेलसर आरोग्य केंद्र तुषार झुरंगे, वाल्हे अतिश जगताप, मोहन शिंदे , मंगल ताई मोरे , परिंचे शैलजाताई, युवा प्रतिनिधी गणेश तांबे इत्यादी नागरिकांनी आरोग्य सेवे मधील कमतरते संदर्भातील प्रश्न मांडले. साप ,कुत्रा चावण्याची लस नसणे, स्वच्छता नसणे, स्टाफ कमी असणे, रात्रपाळीसाठी डॉक्टर उपलब्ध नसणे, बाळंतपणाची सुविधा व्यवस्थित नसणे, खोकल्याचे औषध न मिळणे, ब्लड प्रेशर आणि शुगरच्या तपासण्या वेळोवेळी न होणे, ॲम्बुलन्सची सुविधा नसणे, तरुणांसाठी लैंगिक आरोग्य शिक्षण, लैंगिक आजाराबद्दल, गर्भनिरोधकांबद्दल माहिती न मिळणे इत्यादी प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आले. या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी पॅनलवर असणारे पुरंदर तालुक्याचे आरोग्य अधिकारी विक्रम काळे यांनी समस्या लवकरात सोडवले जातील असे सांगितले.

या आरोग्य संवाद कार्यक्रमात जयश्री नलगे, रवी वाघमारे, शकुंतला भालेराव यांनी आरोग्याच्या प्रश्नांवर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद सदस्य प्राजक्ता दुर्गाडे, हरिभाऊ लोळे यांनी आलेल्या आरोग्य प्रश्नांवर जिल्हा पातळीवर पाठपुरावा करू असे आश्वासन दिले

या कार्यक्रमामध्ये पुरंदर तालुक्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या अंतर्गत काम करणाऱ्या आरोग्य सेविका राणी पांगारे, अनिता नेवसे, आशा कार्यकर्त्या प्रियंका जगताप, रोहिणी माकर, कीर्ती भोसले, संगीता जाधव, सुनिता तांबे यांचा सन्मान करण्यात आला.

मासूम संस्थेच्या तालुका सहसंयोजक जयश्री नलगे, मीना शेंडकर. जिल्हा परिषद सदस्य डॉ.प्राजक्ता दुर्गाडे, हरिभाऊ लोळे, अजय इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत वैशाली कुंभारकर प्रास्ताविक मंगल मगर , मासूम संस्थेचा परिचय मीना शेंडकर, सूत्रसंचालन छाया मल्लाव आणि आभार कावेरी कुंभारकर यांनी मानले.

## महापालिकेच्या विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड

**पुणे (दै. संध्या)**

पुणे महापालिकेच्या विषय समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्षपदाच्या निवडणुका बिनविरोध झाल्याने त्यांच्या निवडीची आज अनौपचारिकता पार पडली. पीठासीन अधिकारी, समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ- मुंडे यांनी ही निवडणुकीची प्रक्रिया पार पाडली. महापालिकेच्या कामकाजात एकूण सात समित्या आहेत.

त्यापैकी स्थायी समिती सर्वात महत्त्वाची आहे, तर उर्वरित सहा विषय समित्यांना आर्थिकविषयक अधिकार नसले तरी धोरणात्मक निर्णय घेतला जातो. त्यामुळे शहरासाठी या समिती महत्त्वाच्या आहेत. या समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदासाठी २३ फेब्रुवारी रोजी अर्ज दाखल झाले होते. या वेळी केवळ भाजपतर्फेच अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध पार पडली.

समिती आणि नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष
विधी समिती - अध्यक्ष - स्वरदा बापट, उपाध्यक्ष - पायल तुपे
शहर सुधारणा समिती अध्यक्ष - स्मिता वस्ते, उपाध्यक्ष - सपना छाजेड
महिला व बाल कल्याण समिती - अल्पना वरपे, उपाध्यक्ष - तन्वी दिवेकर
क्रीडा समिती - अध्यक्ष - नारायण गलांडे, उपाध्यक्ष - दिनेश माथवड
शिक्षण समिती - अरुण राजवाडे, उपाध्यक्ष अतुल तरवडे
नाव समिती - अध्यक्ष - पल्लवी जावळे, उपाध्यक्ष - सुनील पांडे

महापालिकेत पदाधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर गाडी, स्वतंत्र कार्यालय यासह अन्य सुविधा दिल्या जातात. यात महापौर, गटनेते, स्थायी समिती अध्यक्ष, सहा विषय समित्यांचे अध्यक्ष, १५ प्रभाग समिती अध्यक्ष यांच्यासाठी ही सेवा आहे.

## वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई

**उरुळी कांचन (दै. संध्या)**



हवेली तालुक्यातील प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरुळी कांचन येथे अंतर्गत रस्त्यांवरील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन पोलिसांनी शुक्रवारी (ता. २७ फेब्रुवारी) विशेष मोहीम राबवत वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली.उरुळी कांचन परिसरात एमजी रोड व आश्रम रोड हे मुख्य अंतर्गत मार्ग असून येथे दिवसभर मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. खरेदीसाठी येणारे नागरिक अनेकदा दुचाकी व चारचाकी वाहने भर रस्त्यात उभी करून खरेदीसाठी जातात. तसेच मालवाहतूक टेम्पो चालक माल उतरवताना वाहने रस्त्याच्या मध्यभागी उभी करतात. परिणामी, वाहतुकीची कोंडी होत असून पादचाऱ्यांसह वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन पोलीस स्टेशनच्या वतीने एमजी रोड आणि आश्रम रोडवर कारवाई करण्यात आली. वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर दंड आकारण्यात आला तसेच संबंधित वाहनचालकांना समज देण्यात आली. ही कारवाई उरुळी कांचन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश भोसले, पोलीस कॉन्स्टेबल सुमित वाघ, शरद चव्हाण, धनंजय भोसले, अमोल खांडेकर आणि अश्वजीत मोहोड यांनी केली.

> "रस्त्यावर किंवा वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर नियमित दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपली वाहने वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही अशाच ठिकाणी उभी करावीत. दुकानदारांनीही दुकानासमोर रस्त्यावर वाहने उभी करण्यास प्रोत्साहन देऊ नये. सर्व वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे." पुढील काळातही अशीच मोहीम सातत्याने राबविण्यात येणार आहे.
> **- सचिन वांगडे - पोलीस निरीक्षक, उरुळी कांचन पोलीस स्टेशन**

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप

**भिवंडी (दै. संध्या)**



महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार ८ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने महानगरपालिकेचे आयुक्त अनमोल सागर(भा.प्र.से.) यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी महानगरपालिकेचे उप-आयुक्त(मुख्यालय) विक्रम दराडे यांच्या हस्ते सदर सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीचे धनादेश पत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला आणि त्यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या. महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमातीच्या तिसरा मजल्यावरील आयुक्त यांचे सभागृह येथे संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात १) राजेश पंढरीनाथ पवार (सब स्टेशन ऑफिसर) अग्निशमन विभाग – सेवानिवृत्त, २) अनिल शंकर कोकाटे (फायरमन) अग्निशमन विभाग सेवानिवृत्त, ३) संतोष वसंत कोंडलेकर (लिपीक), उपायुक्त (मुख्यालय) सेवानिवृत्त, ४) पुरूषोत्तम गंगाराम यादव (सफाई कामगार) सार्व. आरोग्य विभाग सेवानिवृत्त, ५) बाबुराव पांडुरंग घाडगे, (सफाई कामगार) प्रभाग समिती क्र. १, स्वेच्छानिवृत्त, ६) लक्ष्मी अशोक गांगुल, (सफाई कामगार), प्र.स.क्र.३ स्वेच्छानिवृत्त, ७) कमल गणेश भोईर, (सफाई कामगार), प्र.स.क्र. १- स्वेच्छानिवृत्त, ८) सुशिकला मधुकर परटोळे, (सफाई कामगार), प्र.स.क्र.१ स्वेच्छानिवृत्त अशा ८ कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यात आला.

याप्रसंगी मा. सहा. आयुक्त (सामान्य प्रशासन) शैलेश दोंदे,मिलींद पळसुले, व महानगरपालिकेचे विविध विभागाचे विभाग प्रमुख,अधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य, तसेच युनियन चे सदस्य इ. उपस्थित होते.

## दौंडमधील सात बेकायदेशीर कत्तलखाने उध्वस्त करा : शिवशंकर स्वामी

**यवत (दै. संध्या)**

शहरात कथितरित्या सुरू असलेल्या गोवंशाच्या बेकायदेशीर कत्तलीच्या पार्श्वभूमीवर सात ठिकाणी सुरू असलेले अवैध कत्तलखाने तातडीने उध्वस्त करण्यात यावेत, अशी लेखी तक्रार मानद पशु कल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी यांनी संबंधित प्रशासनाकडे केली आहे. सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली. तक्रारीनुसार कसाई मोहल्ला, खाटीक गल्ली, इदगाह मैदान परिसर तसेच काटेरी झुडपांमध्ये एकूण सात ठिकाणी बेकायदेशीर कत्तलखाने सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरात दररोज मोठ्या प्रमाणावर गोवंशाची कत्तल होत असून त्यामुळे परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात मा. मुख्याधिकारी, मा. तहसीलदार, मा. नगराध्यक्ष तसेच दौंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारीची दखल घेत सकारात्मक चर्चा केली असून चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती शिवशंकर स्वामी यांनी दिली. यावेळी गोरक्षक अहिरेश्वर जगताप, निखिल स्वामी, अजय राऊत, सचिन जवळगे, अक्षय मुरकुटे, संकल्प पाटोळे, विकास शेंडगे, महादेव टकले, रुद्राक्ष लवटे आदी उपस्थित होते. प्रशासनाकडून लवकरच प्रत्यक्ष पाहणी करून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी अपेक्षा गोरक्षकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# नर्सिंग क्षेत्रात सकारात्मक दृष्टिकोनाची गरज – डॉ. अजय चंदनवाला

**समर्पण ओल्ड एज होमच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात निरंतर व्यावसायिक शिक्षण कार्यशाळा संपन्न**

**जेजुरी (दै. संध्या)**



महाराष्ट्र परिचार्या परिषद, जय इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग आणि समर्पण ओल्ड एज होम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निरंतर व्यावसायिक शिक्षण (CNE) कार्यक्रम जेजुरी येथील सावित्रीबाई फुले स्मारक येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास विविध नर्सिंग महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच आरोग्य क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक व सेवानिवृत्त कुलगुरू (आरोग्य विज्ञान विद्यापीठ) डॉ. अजय चंदनवाला होते. प्रमुख पाहुण्या म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तज्ज्ञ मार्गदर्शिका प्रा. डॉ. जयश्री फडणवीस उपस्थित होत्या.

डॉ. जयश्री फडणवीस यांनी आपल्या मनोगतात नर्सिंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींनी स्वतःच्या आयुष्यातील काही वेळ सकारात्मक कार्यासाठी दिला पाहिजे, असे सांगितले. समाजात काहीजण टीका करतील; मात्र त्याकडे दुर्लक्ष करून सातत्याने चांगले कार्य करणे हीच खरी रुग्णसेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येकाने स्वतःमध्ये सकारात्मक दृष्टिकोन जोपासला, तरच उत्कृष्ट दर्जाची रुग्णसेवा घडू शकते, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात समर्पण ओल्ड एज होमचे संस्थापक अध्यक्ष श्री. लक्ष्मण मासाळ यांनीही मनोगत व्यक्त केले. वृद्धांच्या जीवनातील गरजा स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, वयाच्या संध्याकाळी केवळ निवारा नव्हे तर माणुसकीची ऊब आणि संवादाची गरज अधिक असते. वृद्धाश्रमांविषयी समाजात असलेल्या गैरसमजांवर भाष्य करत त्यांनी सांगितले की, कौटुंबिक रचनेतील बदल, स्थलांतर, कामाच्या बदलत्या वेळा आणि मुलांवर येणाऱ्या मर्यादा यामुळे वृद्धाश्रम ही निवड नसून अनेकदा गरज ठरते. "घर म्हणजे फक्त भिंती नव्हे, तर आपुलकी, संवाद आणि माणुसकीचा श्वास," असे म्हणत त्यांनी वृद्धाश्रमाला घराची उपमा दिली.

शासनाने सुरू केलेल्या पॅलेटिव्ह केअर सेवांचा ज्येष्ठांसाठी मोठा आधार ठरणार असल्याचे सांगत त्यांनी शासनाचे आभार मानले. पुढील काळात जय इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग आणि समर्पण ओल्ड एज होम यांच्या सहकार्याने जेजुरीमध्ये परिचारिकांसाठी नियमित CNE कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अजय चंदनवाला यांनी कोरोना काळात नर्सिंग क्षेत्राचे महत्त्व संपूर्ण जगाला पटले, असे सांगितले. नर्सेस आई, बहीण या रूपात रुग्णसेवा करतात. निरंतर शिक्षण ही काळाची गरज असून प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक ज्ञान देण्यावर भर द्यावा, कारण भविष्यात समाजाचे आरोग्य या नर्सेसच्या हातात असणार आहे, असे त्यांनी नमूद केले. "नर्सिंगमुळेच मला आयुष्याची नवी संधी मिळाली," असे भावनिक उद्गारही त्यांनी काढले.

तसेच आदिवासी व दुर्गम भागातील मुलींना 'कमवा व शिका' योजनेद्वारे नर्सिंग शिक्षण देऊन स्वावलंबी करण्यासाठी जयवंत नायकुडे यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास यशदा प्रतिनिधी यामिनी सावंत, ससून नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता भुजबळ, सिंबोसिस नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. सोनोपंत जोशी, सह्याद्री हॉस्पिटल नर्सिंग कॉलेजच्या प्रमुख डॉ. सोनाली तांबे, महाराष्ट्र परिचार्या परिषदेचे पर्यवेक्षक तुकाराम झगडे, तसेच जय इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगचे संस्थापक अध्यक्ष जयवंत नायकुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

समर्पण ओल्ड एज होमच्या सहकार्यातून आयोजित ही निरंतर व्यावसायिक शिक्षण कार्यशाळा नर्सिंग क्षेत्रातील गुणवत्तावृद्धीसाठी महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सर्वसाधारण सभेत चाकणकरांच्या हिताचे व्यापक निर्णय

चाकण (दै. संध्या)



चाकण नगरपरिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकी नंतरची पहिली सर्वसाधारण सभा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. पहिल्या सर्वसाधारण सभेत चाकणकरांच्या हिताचे व्यापक निर्णय घेण्यात आले. सभेच्या प्रारंभी स्व.अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सभेमध्ये विकासाचे व नागरिकांच्या हिताचे अनेक ठराव संमत करण्यात आले. याप्रसंगी मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव,

नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, शिवसेनेचे गटनेते नितीन गोरे, विरोधी पक्षनेते साहेबराव कड, तसेच नगरसेवक ॲड. प्रकाश गोरे, साधना गोरे, जयश्री नायकवाडी, अनिल लोहकरे, पुनम शेवकरी, सागर बनकर, ॲड. वर्षा शेवकरी, मंगेश कांडगे, अनिता घोगरे, विजया जाधव, रणजीत जरे, रूपाली कांडगे, प्रेम जगताप, आरती परदेशी, हर्षद लेंडघर, स्वाती लेंडघर, आकाश जाधव, तृप्ती जगनाडे, प्रकाश भुजबळ, विजया तोडकर, धीरज मुटके, रेश्मा मुटके आदी उपस्थित होते.

सभेमध्ये नागरिकांच्या हिताचे विविध ठराव संमत करण्यात आले. यामध्ये चाकणकर सर्वाधिक त्रस्त असलेल्या पी १ व पी २ पार्किंग टोईंग व्हॅनद्वारे केल्या जाणाऱ्या कारवाई विरोधात सदर कारवाई रद्द करण्याबाबतचा बहुमताने ठराव करण्यात आला. नागरिकांचा तीव्र विरोध आणि व्यापाऱ्यांच्या तक्रारी लक्षात घेता हा विषय प्रथम क्रमांकावर घेण्यात आला. विरोधी गटातील राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी माणिक चौक ते मराठी शाळेपर्यंतच्या परिसरात कारवाई कायम ठेवून इतर भागात ती रद्द करण्याची भूमिका मांडली. तसेच सर्वत्र कारवाई रद्द करण्यास तीव्र विरोध केला. मात्र सत्ताधारी शिवसेना पक्षाच्या वतीने गटनेते नितीन गोरे यांनी स्पष्ट भूमिका घेत डीपीआर मंजूर होईपर्यंत शहरात जोपर्यंत नियोजित व प्रशस्त पार्किंग सुविधा उपलब्ध होत नाही, तोपर्यंत कारवाई थांबविणे आवश्यक असल्याचे सांगितले.

संख्याबळाच्या आधारे बहुमताने संपूर्ण शहरात पी १ पी २ कारवाई तात्पुरती रद्द करण्याचा ठराव शिवसेना गटाच्या पुढाकाराने मंजूर करण्यात आला. सदर ठरावाचे पत्र पिंपरी - चिंचवड पोलिस आयुक्तलायातील वाहतूक विभागाला पाठवण्यात यावे व नगरपरिषदे मार्फत पुढील कार्यवाही करणेबाबत पाठपुरावा करण्यात यावा, असे ठरविण्यात आले. यामुळे लवकरच नागरिक व व्यापारी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. चाकण ग्रामीण रुग्णालयाला स्व.अजितदादा पवार यांचे नाव देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. चाकण नगरपरिषदेची वाढती कामकाजाची व्याप्ती लक्षात घेता स्वतंत्र व सुसज्ज प्रशासकीय इमारत उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. तसेच या नव्या होणाऱ्या इमारतीस स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे यांचे नाव देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून स्वच्छता व्यवस्थेला गती देण्यासाठी सक्शन मशीन, जेटिंग मशीन, फोगिंग मशीन व रोड स्विपिंग मशीन खरेदीस मंजुरी देण्यात आली.

उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील. महिलांसाठी आरोग्याच्या दृष्टीने शहरात स्वतंत्र व स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारली जाणार आहेत. तसेच सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन आणि डिस्पोजल मशीन बसविण्यात येणार आहे.

नागरिकांना सुलभ व परवडणारी आरोग्यसेवा मिळावी, यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना चाकण शहरात व्यापकपणे राबविण्याचा ठराव मंजूर झाला.

शहर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. शहराचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी विना परवानगी फ्लेक्स लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

भटक्या कुत्र्यांवर नियंत्रणासाठी ठोस उपाय योजना करण्यात येणार आहे. संग्राम दुर्ग किल्ल्या समोरील रस्ता पुरातत्त्व विभागाकडून बंद करण्याची कारवाई सुरू असल्याने त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. हा रस्ता शहरातील मुख्य वाहतूक मार्गांपैकी एक असून, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी रस्ता बंदीला स्थगिती मिळविण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच शिवसेना पक्षाचे गट नेते नितीन गोरे यांनी पर्यायी नियोजन करून किल्ल्याच्या सुरक्षेस बाधा न आणता 'महाद्वार' उभारणी सारखा पर्याय सुचविला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### यादववाडी विद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न

काळदरी (दैनिक संध्या) : ज्ञानेश्वरीतील ज्ञानानेच मराठी भाषा समृद्ध झाली.अभंग कधीच भंग होत नाहीत.आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळामध्ये 'वाचन चळवळ' रुजवण्यासाठी ग्रंथप्रदर्शने महत्त्वाची आहेत. पुस्तक वाचले तरच मुलांचे मस्तक सुधारेल.मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' मिळाल्यानंतर हा पहिलाच मराठी भाषा गौरवदिन संपूर्ण महाराष्ट्रभर आपण उत्साहाने साजरा करीत आहोत,असे प्रतिपादन हरगुडे ग्रामविकास संस्थेच्या संचालिका सेवानिवृत्त प्रा.पूजादेवी भोसले यांनी केले. माध्यमिक विद्यालय यादववाडी येथे कविवर्य 'कुसुमाग्रज' अर्थात वि.वा.शिरवाडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला,यानिमित्त ग्रंथदिंडी व ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी पुरंदर तालुका मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष महेंद्र भोसले,विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र शिरसाठ,हनुमंत निगडे यांनी देखील आपली मनोगते व्यक्त केली.अबोली भोंगळे,शमशुद्दीन तांबोळी,दिपक भोसले आदींनी कार्यक्रमाचे आयोजन केले.सुत्रसंचालन वसंत ताकवले,तर दिलीप नेवसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### उत्पादन भरघोस, पण भाव कवडीमोल; जुन्नरच्या कांदा उत्पादकांचा संताप

बेल्हे (दैनिक संध्या) : यावर्षी पाऊस चांगला झाल्याने कांद्याचे उत्पादन चांगले झाले आहे. मात्र, कांद्याला भाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी मेटाकुटीला आला आहे. सध्या मिळत असलेल्या भावाचा विचार करत उत्पादनाचा खर्चही वसूल होत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील राजुरी, बेल्हे, गुंजाळवाडी, गुळुंचवाडी, बांगरवाडी, बोरी बुद्रुक, निमगाव सावा, साकोरी, मंगरूळ, उंचखडक, आणे, नळावणे, शिंदेवाडी, पठार भागातही मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड केली जाते. यंदा उत्पादन चांगले झाले मात्र सध्या कवडीमोल भावात विक्री होत आहे. या परिसरातील कांदा आळेफाटा, ओतूर, जुन्नर, मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत विकला जातो. बाजार भाव कमी मिळत असल्याने भांडवली खर्चही वसूल होणे कठीण झाले आहे. सध्या चांगल्या प्रतीचा कांदा दहा ते पंधरा रुपये किलोने विकला जात आहे. दोन नंबर प्रतीचा कांदा पाच ते दहा रुपये दराने विक्री होत आहे. कांदा उत्पादनाचा खर्च वाढला आहे. खते,औषधे,फवारणीमुळे मशागत खर्च भरमसाठ झाला आहे. मजुरी वाढल्यामुळे कांदा पीकासाठी एकरी 40 ते 50 हजार रुपये खर्च येतो. मात्र, तो देखील वसुल होत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे, असे कांदा उत्पादक संदीप औटी यांनी सांगितले.

### शाळेत धारदार शस्त्राने हल्ला; दोन विद्यार्थी जखमी, एकाची प्रकृती चिंताजनक



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील परमार्थिक सेवा संघ, मुंबई संचलित रेवबाई बालाजी देवकर या विद्यालयांमध्ये नववीच्या विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये आठवीत शिकत असलेल्या दोन विद्यार्थ्यांवर धारदार शस्त्राने हल्ला केला. ही घटना बुधवारी (दि. 25) दुपारी अडीच वाजण्याच्या शाळेच्या आवारामध्ये घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, गुरुवारी (दि. 26) रात्री उशिरा आळेफाटा पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदवण्याचे काम सुरू आहे. याबाबत समजलेली माहिती अशी की, वडगाव आनंद येथील रेवबाई बाळाजी देवकर या शासन अनुदानित शाळेतील आठव्या इयत्तेतील दोन विद्यार्थी शाळेच्या आवारातच नववीतील विद्यार्थ्यांचे भांडण सोडवायला गेले. या वेळी नववीच्या विद्यार्थ्याने धारदार शास्त्राने या दोघांवर वार केले. ही घटना शाळेच्या मधल्या सुटीदरम्यान शौचालयाजवळ घडल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, घटना घडल्यानंतर तातडीने शिक्षकांनी या दोन्ही जखमी विद्यार्थ्यांना आळेफाटा येथील एका खासगी रुग्णालयामध्ये दाखल केले असून, यातील एकाची तब्येत गंभीर असल्याचे वैद्यकीय उपचार करीत असलेल्या डॉक्टरांनी सांगितले. यातील एका अल्पवयीन मुलाच्या श्वसननिकेला गंभीर दुखापत झाल्याने त्याची स्वर नलिका खराब होण्याची भीती डॉक्टरांनी व्यक्त केली आहे. जखमी मुलांपैकी एकाचे मामा यांची आळेफाटा पोलिस ठाण्यात फिर्याद उशिरा दाखल करून घेतली जात आहे. या शाळेमध्ये एकूण 432 विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. गुरुवारी (दि. 26) पालकांनी या शाळेमध्ये जाऊन आमच्या मुलांच्या संरक्षणाचे काय असा सवाल संस्थेला विचारला असल्याचे समजते. दरम्यान, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका मंगला अंकुश घाडगे यांनी या घटनेची माहिती देण्यास नकार दिला.

# निरा डावा कालव्याचे आवर्तन सुरू; बारामती-इंदापूर शेतकऱ्यांना मोठा दिलासा

बारामती (दै. संध्या)



उन्हाळ्याची तीवता वाढत असली तरी निरा डावा कालव्याचे आवर्तन सुरू असल्याने बारामती तालुक्यात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. सध्या सुरू असलेले कालव्याचे आवर्तन जूनपर्यंत सुरू ठेवण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नियोजनातून जिथे कालव्यातून अधिकच्या पाण्याची गळती होत होती. त्या ठिकाणी अस्तरीकरण झाल्याने पाणीगळती कमी होत आहे. पर्यायाने इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनाही पुरेसा पाणीपुरवठा होत आहे, शिवाय कालवा अतिशय स्वच्छ झाला आहे. बारामती, इंदापूर आणि पुरंदर तालुक्यांतील काही भागांना वरदान ठरलेल्या निरा डावा कालव्याचे आवर्तन गेल्या 3 महिन्यांपासून सुरळीतपणे सुरू आहे. यामुळे रब्बी हंगामातील गहू, हरभरा, भाजीपाला आणि फळबागा बहरल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. निरा धरणसाखळीत सध्या 75 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. वीर धरणातून आवर्तन सुरू असल्याने बारामती आणि इंदापूर तालुका उन्हाळ्यात हिरवागार आहे. बारामती आणि इंदापूर तालुक्यांतील छत्रपती, माळेगाव आणि सोमेश्वर या कारखान्यांसह परिसरातील ऊसतोडणी मजुरांनाही जनावरांसाठी, वापरासाठी कालव्याच्या पाण्याचा उपयोग होत आहे. बारामती, इंदापूर या तालुक्यांत उसाचे क्षेत्र मोठे आहे. कायमस्वरूपी आणि हक्काचे पाणी मिळत असल्याने उसासह तरकारी पिकांचे मोठे उत्पन्न या ठिकाणी घेतले जाते. मुबलक पाणी असल्याने शेतीतील उत्पन्न वाढले असून, शेतकऱ्यांना याचा फायदा होत आहे. पालेभाज्या, फळबागा, उसासह शेतात नवनवीन प्रयोग राबविले जात आहेत. शेतकऱ्यांना निरा नदी आणि डावा कालव्याद्वारे शेतीला पाणीपुरवठा होत आहे. डावा कालव्याला पाणी असल्याने विहिरींची पाणीपातळी टिकून राहण्यास मदत होणार आहे. तसेच छोटे उद्योगधंदे, मत्स्यपालन यांनाही याचा उपयोग होत आहे. फेब्रुवारी ते मे या 3 महिन्यांच्या कालावधीत कालवा पूर्णक्षमतेने सुरू राहिल्यास शेतीच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघाला आहे.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर, बारामती, इंदापूर तसेच सातारा जिल्ह्यातील खंडाळा, फलटण व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नदीच्या धरणसाखळीतील गुंजवणी, भाटघर, निरा-देवघर व वीर धरणाचा मोठा आधार आहे. याच धरणातील पाण्यावर या भागात शेती उत्पादनात क्रांती झाली आहे.

## वडिलांनी दिली किडनी, मुलाला मिळाले नवजीवन

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील एका नामांकित खासगी कंपनीमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून काम करणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या अत्यंत गरीब कुटुंबातील 33 वर्षांच्या तरुणाला ऑक्टोबर 2024 मध्ये उच्च रक्तदाबामुळे दोन्ही किडनी खराब झाल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी यावर उपाय म्हणून किडनी प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिला. किडनी खराब झाल्याने त्याचे कामही बंद झाले. अशा परिस्थितीत वडिलांनी किडनी देऊन मुलाला नवजीवन दिले. तरुणावर ऑक्टोबर 2024 पासूनच अकलूज येथील खासगी रुग्णालयामध्ये डायलिसिस सुरू केले. रुग्ण व त्याचे वडील, बहीण यांनी शहरातील अनेक खासगी रुग्णालयांमध्ये प्रत्यारोपणाची चौकशी केली. त्यांना हा खर्च 10-11 लाखांच्या घरात जात असल्याचे समजले. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने इतका खर्च करणे शक्य नव्हते. दरम्यान, ससून रुग्णालयामध्ये किडनी प्रत्यारोपण होत असल्याची माहिती कुटुंबाला समजली. ससून रुग्णालयात समाजसेवा अधीक्षक सत्यवान सुरवसे व अरुण बनसोडे यांनी कुटुंबीयांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर किडनी प्रत्यारोपणासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली. रक्ताच्या नात्यातील व्यक्ती दान करू शकते, याबाबत माहिती मिळाल्यावर वडील तातडीने तयार झाले. मूत्रपिंडरोगतज्ज्ञ डॉ. संदीप मोरखंडीकर व डॉ. निरंजन आंबेकर यांच्या सल्ल्यानुसार सर्व वैद्यकीय तपासण्या केल्यावर वडील अवयवदान करू शकत असल्याचे समजले.

## घोडनदी बंधाऱ्यातील ढापे गळतीमुळे हजारो लिटर पाणी वाया

कवठे येमाई (दै. संध्या)

■ तातडीने दुरुस्ती न झाल्यास पाणीटंचाईचे सावट



शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी-निमगाव दुडे परिसरातील घोडनदीवरील बंधाऱ्यात पाणी अडविण्यासाठी बसविण्यात आलेल्या ढाप्यातून दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर बंधाऱ्यात नदीतील पाणी पूर्ण दाबाने अडवणे अत्यावश्यक असताना या बंधाऱ्यातून मोठ्या प्रमाणात गळती सुरू असल्याने परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, बंधाऱ्याचे ढापे काही दिवसांपासून लिकेज असून पाणी थेट खाली वाहून जात आहे. परिणामी बंधाऱ्यात अपेक्षित प्रमाणात पाणी साठत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. या भागातील बहुतांश शेती ही घोडनदीच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पाणीसाठा कमी राहिला तर आगामी काळात पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी सांगितले की,मागील काही वर्षांपासून पावसाचे प्रमाण अनियमित होत चालले आहे. त्यामुळे बंधाऱ्यातील साठवलेले पाणीच खरी जीवनरेखा ठरत आहे. मात्र सध्या ढापे गळतीमुळे पाणी साठत नसल्याने चालू व उन्हाळी हंगामावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. पाण्याचा अपव्यय सुरूच राहिला तर विहिरी व बोअरवेल वर ताण वाढून पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. संबंधित सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी, निकृष्ट किंवा खराब झालेल्या ढाप्यांची त्वरित दुरुस्ती किंवा बदल करावा आणि बंधाऱ्याची सुरक्षितता तपासावी अशी मागणी ,स्थानिक शेतकरी व नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने वेळेत कारवाई न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला आहे.ग्रामीण भागात पाण्याचे व्यवस्थापन हे अत्यंत संवेदनशील विषय मानला जातो. शासन स्तरावर जलसंधारण, पाणी बचत व सिंचन सुविधा वाढवण्यावर भर दिला जात असताना प्रत्यक्षात बंधाऱ्यांची देखभाल व दुरुस्ती वेळेत न झाल्यास योजनांचा उद्देश च अपूर्ण राहतो. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

# राष्ट्रवादीकडून स्मिता निगडे यांची पुरंदर पंचायत समिती गटनेतेपदी निवड

नीरा (दै. संध्या)



पुरंदर तालुका पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी कोळविहिरे गणातून निवडून आलेल्या स्मिता संतोष निगडे यांची निवड करण्यात आली आहे. ही घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे पुरंदर तालुका अध्यक्ष उत्तमराव धुमाळ यांनी केली. आगामी सभापती व विषय समित्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही निवड महत्त्वाची मानली जात आहे.

गुरुवारी (दि.२६) सासवड येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा दिगंबर दुर्गाडे, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष जालिंदर कामठे, पुरंदर तालुका अध्यक्ष उत्तम धुमाळ, जिल्हा परिषद सदस्य रुपाली झेंडे, प्राजक्ता दुर्गाडे, पंचायत समिती सदस्य स्मिता निगडे, मोनिका कांबळे, अमित झेंडे, अर्चना कटके यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

नुकत्याच पार पडलेल्या पंचायत समिती निवडणुकीत एकूण आठ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसने चार जागांवर विजय मिळवून सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थान मिळवले आहे. कोळविहिरे गणातून स्मिता निगडे, नीरा गणातून मोनिका कांबळे, दिवे गणातून अमित झेंडे आणि गराडे गणातून अर्चना कटके हे राष्ट्रवादीचे सदस्य निवडून आले. तर वीर व बेलसर गणातून शिवसेनेचे प्रविण जगताप व माणिक निंबाळकर, तसेच भिवडी व माळसिरस गणातून भाजपच्या सायली शिंदे व माऊली यादव यांची निवड झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसकडे सर्वाधिक सदस्यसंख्या असल्याने आगामी सभापती निवडणूक आणि विषय समित्यांमध्ये पक्षाची भूमिका निर्णायक राहणार आहे. गटनेते म्हणून स्मिता निगडे यांच्यावर पक्षाची भूमिका मांडणे, सदस्यांमध्ये समन्वय साधणे आणि पक्षाचे धोरण प्रभावीपणे राबविण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## कोरोनानंतर एनजीओंना सीएसआर निधीची नवसंजीवनी

पुणे (दै. संध्या)

■ महाराष्ट्रातील २ हजार संस्थांना सुमारे ३ हजार कोटींचा आधार

कोरोनाकाळानंतर महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांना (एनजीओ) आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला... नियमित देणग्या कमी झाल्याने प्रकल्प अर्धवट राहिले. पण, या संकटाच्या काळात संस्थांना मदतीचा हात मिळाला तो विविध कंपन्यांकडून देण्यात येणाऱ्या सामाजिक दायित्व निधीचा (सीएसआर निधी). महाराष्ट्रातील सुमारे 2 हजारांहून अधिक संस्थांना सध्या सीएसआर निधी मिळत आहे. या संस्थांना अंदाजे 3 हजार कोटी रुपयांचा निधी मिळत असून, शिक्षण, पर्यावरण, आरोग्य यांसह विविध प्रकल्पांसाठी काम करणाऱ्या संस्थांना नवसंजीवनी मिळाली आहे. गेल्या तीन ते चार वर्षांत संस्थांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. विशेषत: संस्थांद्वारे ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांना गती मिळाली आहे. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सामाजिक संस्था या अनेकांसाठी आधारवड आहे. राज्यात आणि पुण्यातही दिवसेंदिवस सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची संख्या वाढत असल्याचे शुक्रवारी (दि. 27) साजरा होणाऱ्या जागतिक स्वयंसेवी संस्था दिनानिमित्त घेतलेल्या आढाव्यात दिसून आले. मुंबई, पुणे, कोल्हापूर असो वा सातारा अशा विविध जिल्ह्यांमध्ये संस्थांची संख्या आणखी वाढली आहे. 2023 च्या एका आकडेवारीनुसार सर्वाधिक नोंदणीकृत असलेल्या संस्थेच्या यादीत उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. पूर्वी संस्थांना देणग्यांवरच सामाजिक उपक्रम राबवावे लागायचे. पण, आता काळाप्रमाणे चित्र बदलले आहे. आता संस्थांना आधार आहे तो आयटी क्षेत्रातील कंपन्या, बांधकाम क्षेत्रातील कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधीचा.